




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १९५ * नांदेड * गुरूवार, दि. २३ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# शरद पवार यांचा काल जंतरमंतरवर विद्यार्थ्यांना पाठिंबा अन् आज पंतप्रधान मोदींना भेटले

## राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपसोबत एनडीए आघाडीत सामील होणार अशी चर्चा असतानाच बुधवारी दिल्लीत अत्यंत महत्त्वाची घडामोड घडली आहे. राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार यांनी बुधवारी सकाळी अचानक संसदेत पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली. या भेटीचे काही फोटो समोर आले आहेत. यामध्ये पंतप्रधान मोदी हे अगदी हाताला धरुन शरद पवार यांना आपल्या कक्षात आणताना आणि हसतखेळत त्यांच्याशी गप्पा मारताना दिसत आहेत.

या भेटीमुळे राजकीय वर्तुळात मोठ्या चर्चांना उधाण आले आहे. नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावरुन दिल्लीच्या जंतर मंतर येथे सुरु असलेले आंदोलन आणि दिल्ली पोलिसांकडून आंदोलकांना बेछूटपणे करण्यात आलेला लाठीमार यामुळे सध्या केंद्र सरकारविरोधात कधी नव्हे इतके नकारात्मक वातावरण निर्माण झाले असून सरकार मोठ्या कोंडीत सापडले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर शरद पवार आणि नरेंद्र मोदी यांनी भेट ही अनेक अर्थांनी महत्त्वाची मानली जात आहे. शरद पवार हे जंतर मंतरवरील आंदोलक आणि केंद्र सरकार यांच्यातील दुवा ठरणार का, अशी चर्चा सुरु झाली आहे.

याबाबत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, मला शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्या भेटीबद्दल नेमकी काही माहिती नाही. पण पवार साहेबांचा जो काही अनुभव आहे, काल ते विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा द्यायला जंतरमंतरवर गेले होते. अभिजीत दिपकेंना भेटले आणि पाठिंबा दिला. पवार साहेब आणि सुप्रिया सुळे पंतप्रधानांसोबत याबाबत चर्चा करायला आणि मार्ग काढावा म्हणून गेले असतील, त्यासंदर्भात बैठक असेल. त्यापलीकडे काही राजकीय चर्चा झाली असेल, असे मला वाटत नाही. शरद पवार काल विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला भेट द्यायला गेले, त्यांनी हे आंदोलन दडपू नये, असे वक्तव्यही केले होते. त्यामुळे आता याबाबत मार्ग निघावा म्हणून ते मोदींना भेटले असतील, असे शशिकांत शिंदे यांनी म्हटले.

### उद्धव ठाकरे पोहचले जंतर मंतरवर

उद्धव ठाकरे मुंबईतून दिल्लीमध्ये पोहोचले आणि त्यांनी दिल्लीमध्ये जंतर-मंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची भेट घेतली व त्यांचं मनोबल उंचावलं. या ठिकाणी बोलताना उद्धव ठाकरे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांच्या संघर्षाचे कौतुक करत, फक्त आता धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा नको, तर या सरकारलाच घालवायला हवं, अशी भावना व्यक्त केली. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी बुधवारी भेटीगाठी करताना आंदोलनाला योग्य दिशेनं नेण्यासाठी चर्चा केली. बुधवारी सकाळी त्यांनी पहिल्यांदा पत्रकार परिषद घेतल्यानंतर आम आदमी पक्षाचे समन्वयक अरविंद केजरीवाल यांची भेट घेत विविध मुद्द्यांवर चर्चा केली. अरविंद केजरीवाल यांच्याशी चर्चा केल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी सुद्धा आंदोलनासंदर्भात चर्चा केली. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी, केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा सरकारकडून गांभीर्याने घेतला जात नसल्याने वेगळ्या रणनीतीची गरज निर्माण झाली आहे, असे मत व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज विरोधात काँग्रेसची निदर्शने



**नांदेड (प्रतिनिधी)–** दिल्ली येथे शांततेत सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या अमानुष लाठीचार्ज विरोधात व विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी, प्रियंका गांधी, काँग्रेस श्रेष्ठमंडळ व खा. रविंद्र चव्हाण यांच्या दिल्ली येथील अटकेच्या निषेधार्थ शहरातील आयटीआय चौकातील महात्मा फुले स्मारकापुढे शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी भाजपाच्या हुकूमशाहीचा निषेध करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजिनाम्याची मागणी करण्यात आली.

दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेला हल्ला हा लोकशाही वर केलेला लाठीचार्ज असून भाजपने देशाची माफी मागून मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा द्यावा अशी मागणी यावेळी उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांनी केले. यावेळी सुरेंद्र घोडजकर, श्रावण रँपनवाड, आनंद चव्हाण, अनिल मोरे, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, मोसिन खान, महेश देशमुख तरोडेकर, रमेश गोडबोले, डॉ. बाकी, शेर अली, कुमार कुर्तडीकर, दिपकसिंग हुजारीया, संजय वाघमारे, रमेश चित्ते, अब्दुल रहिम, गगन यादव, चांदोजी सुर्यवंशी, शंकर शिंदे, अतुल पेदेवाड, गणेश पाटील, आंबादास रातोळे, नागराज सुलगेकर, प्रसेनजित वाघमारे, जेशिका शिंदे, ज्योती कदम, सुरेखा वैद्य, किर्तने ताई, नसिम पठाण, शिवकांता कदम, अक्षय नळगे, प्रबुद्ध चित्ते, नईम शेख, मुरली देशमुख, गोविंद पाटील, प्रकाश दिपके, अजहर शेख, प्रथमेश गिरी, कलिम शेख, सोनू पाटील, जगदीश पावडे, एसपी कुभारे, आदीसह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेडमध्ये रिमझिम : किनवट व माहूरमध्ये सर्वाधिक पावसाची नोंद; आता दमदार पावसाची प्रतिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरासह जिल्हाभरात गेल्या ४८ तासांपासून पावसाची संततधार आणि मुसळधार सुरू आहे. जूनच्या कोरड्या कालखंडानंतर जुलै महिन्यात पावसाने दमदार पुनरागमन केले असून, माहूरमध्ये ४१.९० तर किनवट तालुक्यात सर्वाधिक ३९.९० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. दोन दिवसांपासून पाऊस पडत असलातरी अजूनही दमदार पावसाची प्रतिक्षा आहे.

मंगळवारपासून पडत असलेल्या पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांसह वाहनधारकांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. दरम्यान, मदत व बचाव कार्यासाठी स्थानिक यंत्रणा सज्ज असून, आवश्यकता भासल्यास भारतीय लष्कराचीही मदत घेण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील २४ ते ४८ तासांसाठी नांदेड जिल्ह्याला ‘येलो अलर्ट’ जारी केला आहे.

### नांदेड जिल्ह्यातील पाऊस (मि.मी.मध्ये)

किनवट ३९.९०, माहूर – ४१.९०, अर्धापूर– ३०.८०, उमरी २४.१०, मुदखेड ३६.८०, कंधार ११.९०, मुखेड – ९.४०, लोहा – १५.४०, धर्माबाद १३.८०, भोकर – २१.५०, देगलूर – ७.५०, नांदेड– २४.२०, हिमायतनगर – २९.३०, नायगाव – १२.५०, बिलोली – ९.१०, हदगाव – ३४.५०.

# १० वर्षांत १५० पेपर फुटले, एकालाही शिक्षा नाही; राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गेल्या १० वर्षांत १५२ पेक्षा जास्त पेपर लीक झाले आहेत, ज्यामुळे सुमारे ७.५ कोटी विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्या भविष्यावर परिणाम झाला आहे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर पेपर लीक होऊनही गेल्या १० वर्षांत एकाही दोषीला शिक्षा झालेली नाही. वर्षानुवर्षे ८ ते १० तास अभ्यास करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांऐवजी ४०–५० लाख रुपये मोजणाऱ्यांना मागच्या दाराने संधी मिळत असल्याचा हल्लाबोल लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला.

धर्मेंद्र प्रधान अपयशी शिक्षण मंत्री ठरल्याचा हल्लाबोल त्यांनी केला. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत तीन मागण्या मोदी सरकारसमोर मांडल्या आहेत. राहुल यांनी धर्मेंद्र प्रधानांचा तत्काळ राजीनामा, विद्यार्थ्यांवर अमानुष अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्यात यावी आणि मोदींनी विद्यार्थ्यांची माफी मागावी, अशी मागणी राहुल यांनी केली. विद्यार्थी दहशतवादी नाहीत, त्यांच्यावर पेलेट गन चालवल्या गेल्याचे राहुल म्हणाले.

भारत सरकारचे शिक्षण बजेट १.४ लाख कोटी रुपये आहे. भारतीय कुटुंबे नीट परीक्षेवर १.३२ लाख कोटी रुपये खर्च करतात. नीटचा खर्च देशाच्या शिक्षण बजेटपेक्षा जास्त असल्याचे राहुल म्हणाले.

राहुल म्हणाले की, मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांसाठी सध्याची शिक्षण व्यवस्था परवडणारी उरलेली नाही. देश जितका निधी शिक्षण बजेटसाठी देतो, तितकाच पैसा नीट परीक्षेच्या नावाखाली विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकडून वसूल केला जातो. विद्यार्थी शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांच्यासमोर रोजगाराचे पर्याय कमी होत आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, चिनी वस्तूंच्या आक्रमणामुळे आणि लघुउद्योगांच्या समस्येमुळे उत्पादनातील रोजगाराचे दरवाजे बंद झाले आहेत. बँकांचे कर्ज आणि आर्थिक पाठबळ केवळ मोजक्या मोठ्या व्यावसायिकांनाच मिळते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) मुळे या क्षेत्रांतील नोकऱ्यांवर परिणाम होत आहे.

# सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडण्यासाठी ठेवल्या २ अटी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट परीक्षेच्या पेपर फुटीच्या मुद्यांवरूनच सोनम वांगचुक हे दिल्लीत बेमुदत उपोषणाला बसले होते. अद्याप त्यांनी उपोषण सोडलेलं नाही. या घडामोडीवरून सोनम वांगचुक यांनी एका पत्राच्या माध्यमातून प्रतिक्रिया दिली आहे. सोनम वांगचुक यांनी त्यांचं उपोषण सोडण्यासाठी केंद्र सरकारकडे दोन महत्वाच्या अटी ठेवल्या आहेत. विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनावरून त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जाणार नाही आणि नीट पेपर फुटीच्या मुद्यांवर संसदेत सविस्तर चर्चा करण्याची हमी मिळाल्यास आपण आपलं उपोषण मागे घेण्यास तयार असल्याचं लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

# भाजपचे काँग्रेसच्या जिल्हा कार्यालयासमोर आंदोलन




**नांदेड (प्रतिनिधी)–** सध्या दिल्ली येथे विद्यार्थी अंदोलन करत आसताना कुठलाही संबंध नसताना परजीवी असलेली काँग्रेस व त्याचे नेते आंदोलन भडकावण्याचे प्रयत्न करत असल्याचा आरोप भाजपकडून करण्यात येत आहे. त्याचा निषेध म्हणून बुधवारी देशात सर्वत्र काँग्रेस पार्टी कार्यालयासमोर भाजपकडून आंदोलन करण्यात आले. नांदेड येथे नवामोंढा भागातील काँग्रेस कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले.


यावेळी महानगर अध्यक्ष आ. अमरनाथ राजूरकर तसेच संजय कौडगे, प्रवीण साले, उपमहापौर दिपकसिंह रावत, संतोष मुळे, सरचिटणीस विजय येवनकर, विजय गंभीरे, शितल खांडील, मनोजराज भंडारी, किशोर स्वामी, संजय घोगरे, मिलिंद देशमुख, बजरंग ठाकुर, आशिष नेरलकर, राजू यन्नम, तुलजेश यादव, ज्योती कल्याणकर, कविता गड्डम, शांभवी साले, युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दत्तप्रसाद जाधव, अभिषेक सौदे, साहेबराव गायकवाड, अमोल कदम, बागड्या यादव, महादेवी मठपती, लक्ष्मी वाघमारे, शशिकांत क्षीरसागर, व्यंकटेश जिंदम, अनिलसिंह हजारी, मनोज जाधव, आनंद पावडे, गुरूदिपसिंघ संधू, मारोती वाघ, बालाजी बोकारे, कामाजी सरोदे, गणेश स्वामी, विशाल संपतवार, ओम बंडेवार, विशाल शुक्ला असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# कार्यालयावर येणाऱ्या भाजपला काँग्रेसकडून जोरदार प्रत्युत्तर



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील काँग्रेस कार्यालयापुढे निदर्शने करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांनी, खा. रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनात उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या नेतृत्वात काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार प्रत्युत्तर देत प्रचंड घोषणाबाजीसह भाजपाचा निषेध केला. काँग्रेसच्या आक्रमक प्रत्युत्तरामुळे पोलिसांनी लावलेल्या बॅरिकेट्सच्या पुढे भाजप कार्यकर्ते जाऊ शकले नाहीत.

पोलिसांनी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या मधोमध मोठी पोलीस व्हॅन लावून परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. यावेळी जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफार, सुरेंद्र घोडजकर, श्रावण रँपनवाड, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, मोसिन खान, महेश देशमुख तरोडेकर, रमेश गोडबोले, डॉ. बाकी, कुमार कुर्तडीकर, दिपकसिंग हुजारीया, संजय वाघमारे, बापूसाहेब पाटील, अब्दुल रहिम, गगन यादव, शंकर शिंदे, अतुल पेदेवाड, गणेश पाटील, **(पान ३ वर...)**



# जिल्हा परिषद शाळेच्या वर्ग खोलीचा स्लॅब कोसळला



**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्याच्या मांडवी परिसरातील रामजी नाईक तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या एका वर्गखोलीच्या स्लॅबचा काही भाग बुधवार, दि. दि.२२ जुलै रोजी सकाळी कोसळला. शिक्षकाच्या प्रसंगावधानामुळे अनर्थ टळला.

रामजी नाईक तांडा येथे पहिली ते पाचवीपर्यंतची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असून, शाळेत २ शिक्षक व ४० विद्यार्थी आहेत. शाळेत दोन वर्गखोल्या आणि एक किचन रूम आहे. मात्र, किचन रूम आणि एका वर्गखोलीला पावसामुळे आधीच गळती लागली होती. त्यामुळे बऱ्या स्थितीत असलेल्या एका खोलीत वर्ग भरविण्यात येत आहे. बुधवारी सकाळी ९ वाजता नेहमीप्रमाणे शाळा भरली.

शाळा सुरू झाल्यावर काही वेळातच वर्गखोलीच्या छतावरून स्लॅबचे तुकडे हळूहळू खाली पडू लागले. ही गंभीर बाब तेथील मुख्याध्यापक अशोक हलवले व शिक्षक सुरेश पडीवार यांच्या लक्षात आली. त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ४० मुलांना तत्काळ सुरक्षितपणे बाहेर काढले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी शाळेकडे धाव घेतली. त्यांनी वर्गातील बेंच, खुर्च्या, टेबल व इतर शैक्षणिक साहित्य सुरक्षितपणे दुसऱ्या खोलीत हलविले. केंद्रप्रमुख पी.टी. राठोड यांनी तातडीने शाळेला भेट दिली. तसेच सरपंच उत्तम मेश्राम, **(पान ३ वर...)**

# अयोध्या : धार्मिक व्यवस्थापनासाठी नऊ सदस्यीय समिती स्थापन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या बुधवारी झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत मंदिराच्या व्यवस्थापन आणि धार्मिक कार्यक्रमांच्या नियोजनाबाबत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. मंदिरातील सर्व धार्मिक विधी, दैनंदिन पूजा–अर्चना आणि वार्षिक उत्सवांच्या संचालनासाठी विशेष नऊ सदस्यीय धार्मिक समितीची स्थापना करण्यात आली आहे.

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या समितीमध्ये एकूण नऊ सदस्यांचा समावेश करण्यात आला असून, त्यापैकी अयोध्येतील पाच प्रमुख संत आणि बाहेरील चार धार्मिक सदस्यांचा समावेश आहे.

# राज्याच्या अनेक भागात पावसाचं कमबॅक; पुढील ४ दिवस राहणार कायम

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात अनेक जिल्ह्यात पावसाचा कमबॅक झाला आहे. पुढील चार राज्यात पावस कायम राहण्याची शक्यता वर्तविली आहे.

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, नाशिक आणि कोल्हापूरच्या घाटमाथा भागांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून, या ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय, विदर्भातील अनेक भागांमध्येही जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, तसेच प्रशासन आणि हवामान विभागाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडतोय. मात्र काही भागात ढगाळ वातावरणातून तूरळक पावसाची स्थिती पाहायला मिळत असल्याच हवामान विभागाने म्हटलं आहे. पुण्यासह घाटमाथ्यावर बऱ्यापैकी पाऊस आहे. मात्र विदर्भातील नंदुरबार, मराठवाड्यातील हिंगोलीसह राज्यात बऱ्याच ठिकाणी तूट असल्याचं चित्र आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाचे अधिकारी डॉ. एस. डी. सानप यांनी दिली. विदर्भ आणि कोकणासाठी पुढील चार दिवस ऑरेंज अलर्ट दिला आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# शास्त्रज्ञांची गळती: धोक्याचा इशारा?

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ही आज केवळ भारताची नव्हे, तर जगभरात विश्वासार्ह, किफायतशीर आणि नाविन्यपूर्ण अंतराळ संशोधनासाठी ओळखली जाणारी संस्था आहे. चांद्रयान, मंगळयान, आदित्य-एल १ आणि आता गगनयानसारख्या महत्त्वाकांक्षी मोहिमांमुळे भारताने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. अशा वेळी इस्रो-मधील १०० ते १२० अनुभवी शास्त्रज्ञांनी राजीनामे दिल्याची माहिती समोर येणे ही अत्यंत चिंत-ाजनक बाब आहे. ही केवळ कर्मचाऱ्यांची गळती नसून देशाच्या वैज्ञानिक क्षमतेसाठी धोक्याची घंटा आहे. शास्त्रज्ञ घडविण्यासाठी अनेक वर्षांची मेहनत, उच्च दर्जाचे शिक्षण, संशोधनाचा अनुभव आणि मोठी आर्थिक गुंतवणूक लागते. एका अनुभवी शास्त्रज्ञाचा राजीनामा म्हणजे केवळ एका व्यक्तीची जागा रिकामी होणे नव्हे, तर त्याच्यासोबत मौल्यवान अनुभव, कौशल्य आणि संशोधनाची परंपराही बाहेर जाणे होय. त्यामुळे अशा प्रकारची गळती दीर्घकालीन दृष्टीने देशाच्या विकासावर परिणाम करू शकते. विशेषतः गगनयानसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या मोहिमांवर काम करणाऱ्या वैज्ञानिकांच्या निर्गमनामुळे प्रकल्पांच्या वेळापत्रकावर आणि गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विक्रम साराभाई अंतराळ केंद्र, यू. आर. राव उपग्रह केंद्र यांसारख्या इस्रोच्या प्रमुख संस्थांमधून अनुभवी अधिकारी बाहेर पडत असल्याची बाब अधिक गंभीर आहे. चांद्रयान-३, एलव्हीएम-३ आणि स्पेडेक्ससारख्या मोहिमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेल्या वैज्ञानिकांनीही संस्था सोडल्याची माहिती या चिंतेत आणखी भर घालते. या राजीनाम्यांमागील नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नसली, तरी त्याचा शोध घेणे सरकार आणि इस्रो प्रशासनासाठी अत्यावश्यक आहे. केवळ राजीनाम्यांवर निर्बंध घालून हा प्रश्न सुटणार नाही. शास्त्रज्ञांना चांगले संशोधन वातावरण, स्पर्धात्मक वेतन, करिअरची स्पष्ट संधी, आधुनिक सुविधा आणि निर्णय प्रक्रियेत अधिक स्वातंत्र्य मिळाले, तरच त्यांना संस्थेत टिकवून ठेवता येईल. अन्यथा खासगी अंतराळ उद्योग किंवा परदेशातील संशोधन संस्था त्यांना सहज आकर्षित करतील. भारताच्या अंतराळ क्षेत्रात खासगी उद्योगांचे स्वागत होत आहे. 'विक्रम-१' या पहिल्या खासगी रॉकेटचे प्रक्षेपण हा भारतीय अंतराळ क्षेत्रासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. मात्र खासगी क्षेत्राची प्रगती आणि इस्रोतील प्रतिभेची गळती यामध्ये संतुलन राखणे तितकेच आवश्यक आहे. सार्वजनिक संशोधन संस्थाच देशाच्या मूलभूत वैज्ञानिक क्षमतेचा पाया असतात. हा पाया कमकुवत झाला, तर भविष्यातील संशोधन, संरक्षण, हवामान अंदाज, दळणवळण आणि अवकाश अर्थव्यवस्था यांवरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. आज जगात कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणक, अवकाश तंत्रज्ञान आणि संरक्षण संशोधन यामध्ये तीव्र स्पर्धा सुरू आहे. अशा काळात भारताने आपल्या वैज्ञानिक मनुष्यबळाला जपणे ही राष्ट्रीय गरज आहे. विकसित भारताचे स्वप्न केवळ पायाभूत सुविधा उभारून पूर्ण होणार नाही; त्यासाठी उच्च दर्जाचे संशोधन आणि त्यामागे काम करणारे प्रतिभावान शास्त्रज्ञ टिकवून ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे. शास्त्रज्ञांचे राजीनामे हा केवळ इस्रोचा अंतर्गत प्रशासकीय विषय नाही. तो देशाच्या वैज्ञानिक स्वावलंबनाशी, राष्ट्रीय सुरक्षेशी आणि आर्थिक प्रगतीशी संबंधित प्रश्न आहे. सरकारने या गळतीची कारणमीमांसा करून तातडीने प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. शास्त्रज्ञांचा सन्मान, त्यांच्या संशोधनाला प्रोत्साहन आणि दीर्घकालीन करिअरची हमी दिली, तरच भारताची अंतराळ भरारी अधिक उंच जाईल. इस्रोने जगाला भारताची वैज्ञानिक ताकद दाखवून दिली आहे. आता ही ताकद टिकवून ठेवण्याची जबाबदारी सरकार, प्रशासन आणि समाज या सर्वांची आहे. कारण शास्त्रज्ञांचे हात मजबूत असतील, तरच देशाचा विकास वेगवान होईल; अन्यथा प्रतिभेची ही गळती भविष्यात भारताच्या प्रगतीवर मोठा परिणाम करू शकते.

# महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद



भारताच्या स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले. यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने घेतले जाते. त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे. चंद्रशेखर आझाद यांचा जन्म २३ जुलै १९०६ ला मध्यप्रदेशातील झाबुआ (अलिराजपूर) जिल्ह्या-तील भावरा या गावी झाला. जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतीची ज्योत पेटत होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले. परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धगधगत होती.

चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले. त्यामुळे ते धनुष्यबाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्या व क्रांतिकारक वृत्ती होती. १३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला व तळपायाची आग मस्तकात गेली. त्यानंतर चंद्रशेखर आझाद १९२० मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या १५ व्या वर्षी त्यांना अटकही झाली. अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला १२ फटक्यांची अमानुष शिक्षा दिली. चंद्रशेखर आझाद यांचे मूळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते. परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले. तेव्हापासून संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले. आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास उडाला व क्रांतीची ज्वाला प्रगट झाली आणि ते क्रांतिकारक झाले.

आझाद यांचा क्रांतिकारी हेतू पहाता १९२२ साली महात्मा गांधींनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना खूप वाईट वाटले. अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली. पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक रामप्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली. क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमीच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले. चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते. भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केले. अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमीप्रमाणे चकमा देतच होते. दि. २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबादमधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरू हे जेलमध्ये असताना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता, एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी अल्पवयात आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला. त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे. देशा-तील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून, घरांवर तुळशीपत्र ठेवून, आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे. कारण देशातील जनता सुखी- समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता. आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमारी, महागडे शिक्षण, भ्रष्टाचार, पेपर फुटी, रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना आणि विद्यार्थ्यांना करावा लागतो आहे.

आज १४५ करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही. परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार - खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत करून ठेवली आहे. यामुळे हा पैसा १४५ कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही. यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य, शेतकरी व गरीब लोकांना भोगावा लागत आहे. राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे. तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडून क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल. त्याचप्रमाणे देशात वाढते प्रदूषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत. यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ज्ञात राहील व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला पेटताना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम.

**-रमेश कृष्णराव लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# श्री विठ्ठल वारी आणि वारकरी

महाराष्ट्र ही अनेक धर्म, पंथ, संप्रदाय, विचारप्रवाह यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणारी समन्वयभूमी आहे. वीरत्व आणि वैराग्याच्या परंपरा येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदल्या. नाथ, दत्त, वारकरी, महानुभाव, गणेश, सुफी, कबीर, समर्थ, आणि वीरशैव असे अनेक धर्मसंप्रदाय मराठी भूमीत रुजले आणि विकसितही झाले. संत-महंतांच्या शुद्ध विवेकनिष्ठेतून सांप्रदायिक समन्वयाचे वातावरण सतत नांदत राहिले, मध्ययुगीन ज्ञान-भक्तिप्रधान सर्व विचारप्रवाहांनी आध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित केली. त्यात वारकरी धर्मसंप्रदायाचा वाटा भरीव असा आहे.

**वारकरी संप्रदायाचे आचारधर्म :** वारकरी संप्रदायाचे आचारधर्म, समत्वदृष्टी, विश्वबंधुत्व, प्रीती या तत्त्वातून निर्माण झाले आहे. या आचारधर्माना नीतिशास्त्राचे तात्त्विक अधिष्ठान आहे, म्हणून वारकऱ्याच्या आचारांना कर्मकांडाचे स्वरुप कधी प्राप्त झाले नाही. श्री विठ्ठल हाच समत्व धारण करणारा हरिहरैक्याचे प्रतीक असल्याने वारकऱ्यांच्या आचरणात समन्वयशीलता दिसून येते. या संप्रदायाचा ध्वज भगवी पताका असून, भजनकीर्तन करताना टाळ, मृदंग, वीणा यांचा वापर केला जातो. गळ्यात तुळशीमाळ व कपाळावर गोपीचंदनाचा टोळा ही वारकरी संप्रदायाची प्रतीके आहेत.

**वारकऱ्यांचे दैवत श्री विठ्ठल :** 'पांडुरंग', 'पंढरीनाथ', 'विठोबा', 'विठ्ठल', 'गोविंद', 'हरी', 'बाप रखुमादेविवरू' अशा अनेक नावांनी माणसाचे मन व्यापून टाकणारी श्री विठ्ठल ही आराध्यदेवता आहे. ज्ञानोबांपासून निळोबांपर्यंतच्या सर्वश्रेष्ठ संतांनी त्यांच्या चरणचिंतनात जीवनाची कृतार्थता अनुभवली आहे. त्यांची वाणी त्यांच्या गुणगायनाने रंगलेली आहे. त्यांनी त्याला 'विष्णुसहित शिव' मानले आहे, 'बौद्ध' या बिरुदाने वाहिले आहे; त्याला 'जिनपुत्र बुद्ध' म्हटले आहे. विष्णूच्या नवव्या अवताराच्या ठायी त्याची स्थापना केली आहे; त्याला 'दिगंबर' म्हटले आहे : 'कानडा कर्नाटकु' म्हणून संबोधले आहे. याचाच अर्थ असा की, संतांनी आपल्या उदार आणि उन्नत दृष्टीतून शैव, वैष्णव, बौद्ध, जैन इत्यादी संघर्षशील धर्मधारांचा विठ्ठलाच्या ठायी सुमधुर संगम साधला आहे. अनेक संप्रदाय महाराष्ट्रात उदय पावले, नांदले आणि क्षीणही झाले; परंतु विठ्ठलभक्तीची धारा मात्र अजूनही उभ्या महाराष्ट्राची भावभूमी भिजवत वाहत राहिली आहे. म्हणूनच मराठी, कानडी, तामीळ इत्यादी संस्कृतीचा संगम असलेला हा 'विठ्ठल एक महासमन्वय' आहे. विठ्ठल ही सर्व विश्वाची व देवतांची मूलभूत देवता होय. सर्वांचे मूळ प्रेम आहे व त्याचे सगुणरुप श्री विठ्ठल होय.

**रामकृष्णहरी :** 'रामकृष्णहरी' हा वारकऱ्यांचा षडाक्षरी मंत्र आहे. या मंत्राविषयी प्रत्येक वारकऱ्यात अतीव श्रद्धाभाव आहे. वारकऱ्यांना रामकृष्णहरी या मंत्रात राम आणि कृष्ण ही विष्णूची दोन रुपे अभिप्रेत आहेत. या मंत्राचे स्वरुप बीज मंत्राप्रमाणे नसून ती एक प्रेमळ हाक आहे. रामकृष्णहरी मंत्राप्रमाणेच विठ्ठलाच्या नामस्मरणाला महत्त्व आहे. विठ्ठल, विठोबा रखुमाई यांचे भजन 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' चालीलाही वारकरी संप्रदायात महत्त्व आहे.

**मुद्राचारण :** मुद्राधारण, हाही वारकऱ्यांचा एक आचारविशेष. गोपीचंदनाच्या गंधाची मुद्राधारण करणे किंवा कपाळाला बुक्का लावणे ही संप्रदायाची विशिष्ट खूण समजली जाते. हाती भगवी पताका घेऊन टाळ-मृदंगाच्या आवाजात पंढरीच्या वारीला जाणारा 'भागवत' परमार्थाच्या क्षेत्रात स्वतःला 'वीर' म्हणवून घेतो. गोपी श्रीकृष्णाच्या भक्तीत रमणाऱ्या होत्या. त्यांची स्मृती गोपीचंदनात असल्याने त्याचा गंध व मुद्रा धारणा गोपीप्रमाणे आपल्यातही बाणावी, अशी भावना यामागे असते.

**वारी :** 'वारी' ही वारकऱ्यांच्या जीवननिष्ठेचा एक भाग आहे. आषाढी, कार्तिकी पंढरीची वारी करणारा तो वारकरी असे संबोधले जाते. आषाढी शुद्ध एकादशीची वारी पंढरीची वारी ती देवाची आणि कार्तिक एकादशी ही आळंदीची वारी संताची. सर्व भेदभाव विसरुन विठ्ठल व वारकऱ्यांना भक्त 'उराउरी' भेटतात. या दोन्ही वाऱ्या वारकऱ्यांच्या प्राणभूत होत.

**भजन :** वारकरी संप्रदायाच्या सामूहिकतेचे व एकतेचे मर्म भजनात दडलेले आहे. इथे प्रत्येकाच्या कृतीला समावसर आहे, वारकरी संप्रदायात भजन हे महत्त्वाचे प्रमाण आहे. तुकोबा म्हणतात,

तुका म्हणे एथ भजन प्रमाण ।
काय थोरपण जाळावे ते ।।
(तु.गा. अ.क्र. २७९८)

यामुळेच 'भजन करा सावकाश' असे संत बहिणाबाई म्हणतात.

वीणा, टाळ-मृदंगाच्या घोषात ब्रह्मरस सेवन करणे म्हणजे भजन होय.

लावुनि मृदंग श्रुति टाळ घोष । सेवू ब्रह्मरस आवडीने ।। (तुकाराम)

सुरुवातीस 'रामकृष्णहरी' भजन म्हणावयाचे. रमविणारा राम, आकर्षित करणारा कृष्ण व सर्व वृत्तीहरण करुन त्यांना प्रेमात (रमविणारा) हरी, भजन करता-करता वृत्ती तल्लीन होऊन जिवास गोड वाटते. ती गोडीच विटेवर उभी आहे. म्हणून तर

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनिया ।।
(तु.गा. अ.क्र. ०२) हा किंवा
रुप पाहता लोचनी ।
मुख झाले यो साजणी।। (ज्ञानेश्वर)

हा अभंग म्हणावयाचा. नंतर हे ध्यान हृदयात ठेवण्यास्तव रुपाचे काही अभंग म्हणावयाचे.

तुझे रुपी डोळे ।
निवती सकळ सोहळ ।।

वगैरे अभंग म्हटल्यावर विठोबा-रखुमाई भजन करावयाचे. यानंतर आवडीनुसार नामपर, एकविश्व करुणापर, मागणीपर अभंग म्हणावयाचे, प्रसंगानुसार नाट, वासुदेव, खेळीचे इत्यादी अभंग म्हणावेत. नंतर ज्ञानेश्वर महाराजांच्या स्तुतिपर अभंग म्हणून ज्ञानेश्वर माऊलीचे भजन करावे. शेवटी संताचा अभंग म्हणून पांडुरंगाची, ज्ञानेश्वरांची व तुकोबांची आरती म्हणावी.

**कीर्तन :** महाराष्ट्रातील पारंपरिक, सांस्कृतिक संस्थांमध्ये कीर्तनसंस्थेला असाधारण महत्त्व आहे. यात गायन, वादन, वक्तृत्त्व, अभिनय, विनोद, गांभीर्य आणि श्रोता प्रेक्षकांच्या संबंधीची हृदयस्पर्शी आपुलकी या सर्व विशेषांचा अप्रतिम संयोग आढळतो. महाराष्ट्रातील कीर्तनकारांनी भारतीय व विशेषतः हिंदू संस्कृतीचे रक्षण केले. धर्मोपदेशाचे आणि सत्प्रचाराचे प्रभावी माध्यम म्हणून महाराष्ट्रातील संतमहंतांनी या संस्थेचा अत्यंत यशस्वीपणे वापर केला. केवळ धर्मोपदेशाचे साधन म्हणून नव्हे तर राष्ट्रीय भावनेच्या जागृतीसाठीदेखील कीर्तनाचा उपयोग भारतातील कीर्तनकारांनी केला.

वारकरी संप्रदायाने उभारलेले हे महत्त्वा-चे व्यासपीठही आहे. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।' या संत नामदेवरायांच्या उक्तीतून कीर्तनाचे कार्य स्पष्ट होते. भजनाप्रमाणे कीर्तन हेही नामस्मरणाचे विस्तारित रुप आहे. परिणामी कीर्तनालाही सामूहिकतेचे परिणाम लाभलेले आहे. अर्थात व्यक्तिगत पातळीवरही भजन व कीर्तन या आचारधर्माचे पालन करता येते. म्हणूनच तुकोबांनी म्हटलेले आहे की,

चित्ताचे आसन। तुका करितो कीर्तन ।।



(तु.गा. अ.क्र. १२९१)

कीर्तनाच्या व्यासपीठावरुन वारकरी संतांनी आपल्या संप्रदायाची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. भक्ती, नामस्मरण आणि नामाचा गजर ही वारकरी संप्रदायाची वैशिष्ट्ये होत. यामुळे कीर्तनात घटपटादी चर्चा, उपदेश कथन वगैरे गोष्टींपेक्षा भजनाला नामाच्या गजराला अधिक महत्त्व असते. वारकरी संप्रदायाचे कीर्तन इतर कीर्तन पद्धतीपेक्षा वेगळे आहे. पंडिताच्या प्रवचनाशी किंवा हरदासाच्या दरबारी कीर्तनाशी याचा संबंध नाही.

**वारकरी कीर्तन पद्धती :** वारकरी कीर्तनात कीर्तनकार स्वतःमध्ये उभा राहून भोवती एक विणेकरी व काही टाळकरी उभे असतात. प्रारंभी 'जय जय रामकृष्ण हरी' हे भजन होते. नंतर 'सुंदर ते ध्यान..' हा तुकोबांचा अगर 'रुप पाहता लोचनी' हा ज्ञानोबांचा अभंग म्हणतात. नंतर पुन्हा 'जय जय रामकृष्ण हरी' हे भजन होते. यानंतर कीर्तनासाठी घेतलेला अभंग म्हटला जातो. कीर्तनासाठी ज्ञानदेव महाराजांपासून ते निळोबाराय यांच्यापर्यंतच्या वारकरी संतांच्या अभंगापैकी एक अभंग घेतात. अभंग म्हटल्यानंतर 'जय जय विठोबा रखुमाई' हे भजन होते. नंतर कीर्तनासाठी घेतलेल्या अभंगाचे सुरुवातीचे कडवे विणेकरी चालीवर म्हणतो. नंतर विठ्ठल, विठ्ठल असे नामस्मरण होते. भजन झाल्यानंतर संपूर्ण अभंगाचे साधे सुस्पष्टपणे उच्चारण करुन कीर्तनास सुरुवात होते. वारकरी कीर्तनात पूर्वरंग व उत्तररंग असे विभाग नसतात. अभंगाचे एकेक कडवे घेऊन त्याचे विवरण केले जाते. विवरणाच्या ओघात विषयास अनुरूप अशी संतवचने प्रमाण म्हणून दिली जातात. ज्ञानेश्वरी, नाथ महाराजाचे भागवत व सर्व वारकरी संतांचे अभंग यातील वचने प्रमाणासाठी प्रायः वापरली जात एकवाक्यतेचा भंग होऊ नये म्हणून वारकरी संताखेरीज इतर संतांची बचने वापरली जात नाहीत, कीर्तनाच्या मूळ विषयाच्या स्पष्टीकरणासाठी चपखल दृष्टांत वापरले जातात. संतांच्या चरित्रातील प्रसंगही समुचितपणे उल्लेखिले जातात.

कीर्तन हा देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणी संगम आहे. कीर्तनामुळे 'जळती दोषाचे डोंगर, शुद्ध होती नारी नर' या दृष्टीने कथाकाळी काही मर्यादांचे पालन कीर्तनकार व भक्त श्रोते या दोघांनीही करायला हवे तुकोबा म्हणतात..

जेथे कीर्तन करावे । तेथे न सेवावे ।। धृ।।
बुका लावू नये भाळा ।
माळ घालू नये गळा ।।
तट्टा वृषभासी दाणा ।
तृण मागो नये जाणा ।।२।।
तुका म्हणे द्रव्य घेती ।
देती तेही नरका जाती ।।३।।
(तु.गा. अ.क्र. ३०८४)

या मर्यादा सर्वांनी पाळाव्यात,
असे तुकोवा म्हणतात.

वारकरी पंथीयांनी आपल्या धर्मप्रचारासाठी एक नवे वाक्पीठ निर्माण केले. त्याची निरुपणे व कीर्तने यांचा थाट अगदी वेगळा आहे. पंडितांच्या पुस्तकी प्रवचनांशी किंवा हरदासांच्या दरबारी कीर्तनाशी त्याचे यत्किंचितही साम्य नाही. लोकांत आत्म ीयता आणि आत्मविश्वास उत्पन्न होण्यासाठी लोकांतील पुढारी आघाडीवर यावे लागतात. वारकरी पंथाने लोकांतून धर्मप्रवक्ते तयार केले. नामदेव हा त्यांच्या कीर्तनसंप्रदायाचा आद्यप्रवर्तक होय. 'सुबांचा करदोडा रकट्याली लंगोटी । नामा वाळवंटी कथा करी ।। हे दृश्य शुद्रातिशूद्रांना खरोखरच किती स्फुर्तिदायक वाटले असेल ? आपल्या धर्मजोवनात ही घटना निःसंशय अभूतपूर्व अशीच होती.११ अध्यात्मविधा ही कोणाचीही मक्तेदारी नसून अठरापगड जातीतील कोणालाही कीर्तन करता येते. 'आम्हा कीर्तन कुळवाडी' या भावनेने सर्वसामान्यांनी कीर्तन या माध्यमाचा वापर नामस्मरणासाठी व समाजप्रबोधनासाठी केला.

**- प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे**
मराठी विभागप्रमुख,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर
मो. ९८२३६९७४०२

# विद्रोह शिक्षणाचा



शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो ते आत्मसात करेल तो गुरगुरल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. शिक्षण हे मानवी जीवनाचा पाया आहे जी व्यक्तीला ज्ञान, कौशल्य, योग्य मूल्य प्रदान करते. शिक्षण माणसाला केवळ साक्षर करत नाही तर त्याची विचारशक्ती वाढवून त्याला स्वालंबी व आत्मविश्वासू बनवते. शिक्षणामुळे माणसाच्या ज्ञानात भर पडते आणि त्याचा दृष्टिकोन व्यापक होतो आणि सामाजिक प्रगतीसाठी तो देशासाठी मोलाचे योगदान देऊ शकतो यासाठी शिक्षणाचे महत्त्व आहे.

समाजात शिस्त, समानता व सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे आहे. याबरोबर शिक्षण आर्थिक विकासासाठीही आवश्यक आहे. शिक्षणामुळेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात आणि त्यामुळे त्या व्यक्तीचे जीवनमान उंचावते व ते देशाच्या प्रगतीसाठी पुरक ठरते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि राष्ट्रनिर्मितीची प्रभावी माध्यम आहे म्हणून प्रत्येक व्यक्तीपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहचवणे ही काळाची गरज आहे.

शिक्षण व्यवस्था ही कोणत्याही राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा भक्कम पाया असते. सुशिक्षित नागरिक हे देशाच्या प्रगतीचे खरे शिल्पकार असतात. शिक्षण हे शिक्षण व्यवस्थाला, राष्ट्राला कुशल व मनुष्यबळ प्रदान करते. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, शेती, आरोग्य आणि प्रशासन अशा सर्व क्षेत्रांमध्ये प्रगतीसाठी शिक्षित व प्रशिक्षित व्यक्तीची आवश्यकता असते त्यामुळे देशाची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक उन्नती घडून येते. शिक्षणामुळे नागरिकांमधील लोकशाही मूल्य, राष्ट्रीय एकात्मताने सामाजिक समस्या याची जाणीव निर्माण होते. अज्ञान, गरिबी, बेरोजगारी आणि अंधश्रद्धा यांसारख्या समस्यांवर मात करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे.

राष्ट्राच्या भविष्यातील पिढ्या घडविण्याचे कार्य शिक्षण व्यवस्था करते म्हणून शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता जितकी उत्तम असेल तितका देश अधिक प्रगत सक्षम व समृद्ध बनतो. त्यामुळे शिक्षण व्यवस्था ही राष्ट्राच्या विकासाचा पाया आहे. भारतीय शिक्षण व्यवस्था ही जगातील सर्वात मोठ्या शिक्षण व्यवस्थांपैकी एक आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे आणि राष्ट्राच्या विकासासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करणे हा तिचा मुख्य उद्देश आहे. प्राचीन काळी आश्रम किंवा गुरुकुलात मौखिक ज्ञान व जीवन कौशल्य, नीतिमत्ता, संस्कार यांची ओळख त्या ठिकाणी करून दिली जाईल. सध्या शाळा, महाविद्यालयात पुस्तके व परीक्षाभिमुख शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर गरीब, होतकरू व महिला यांसाठी मुक्त व दुरुस्त शिक्षण प्रणाली निर्माण झाली आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणा हे शिक्षणाचे प्रमुख टप्पे आहेत.

भारतीय शैक्षणिक धोरण म्हणजे देशातील शिक्षण व्यवस्था अधिक प्रभावी गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक बनविण्यासाठी शासनाने आखलेली मार्गदर्शक तत्वे आहे. शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट प्रत्येक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे त्याचा सर्वांगीण विकासाला चालना देणे आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी सक्षमणारे नागरिक घडविणे ही आहे.पारंपरिक मूल्य न गमावता झपाट्याने बदलणाऱ्या जगाच्या गरजांशी जुळून घेण्याचा प्रयत्न आजची भारतीय प्रणाली प्रकल्प आधारित पद्धतीचा अवलंब करते. आजची शिक्षण प्रणाली ही केवळ पुस्तकी ज्ञान देणारी राहिली नाही तर ती रोजगाराभिमुख व तंत्रज्ञानावर आधारित बनली आहे. डिजिटल क्लासरूम, ऑनलाइन शिक्षण, कौशल्यावर आधारित शिक्षण याला महत्व दिले जाते. ग्रामीण भागात खाजगीकरणाचे प्रमाण कमी जरी असले तरी ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रशिक्षित शिक्षक, आधुनिक सुविधांचा अभाव व शिक्षण विषयी जागृतीचा अभाव आपल्याला पाहायला मिळतो. विद्यार्थी हे समाजाचे व राष्ट्राचे भविष्य मानले जातात, परंतु आजघडीला जर आपण पाहिले तर शिक्षणासंबंधित समस्या, अन्याय, अपुऱ्या सुविधा या विरोधात विद्यार्थी बंड पुकारत आहेत. आपल्या हक्कांसाठी आवाज उठविण्यासाठी ते आंदोलन करत आहेत.

शिक्षण क्षेत्रातील वाढती फी, शिष्यवृत्तीतील अडचणी, प्रवेश प्रक्रियातील त्रुटी, वसतिगृह, शैक्षणिक सुविधांचा अभाव व परीक्षांमधील गैरव्यवहार या कारणांमुळे विद्यार्थ्यांना आंदोलन करावी लागतात. या मागे शिक्षणातील सुधारणा आणि समान संधी मिळावी ही विद्यार्थ्यांची प्रांजल भावना असते. दरम्यानच्या काळात लडाखची भूमिपुत्र प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते शिक्षक व संशोधक सोनम वांगचुक यांनी २८ जून २०२६ पासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट परीक्षा पेपर फुटीप्रकरणी बेमुदत उपोषण सुरू केले. या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत होता. सोनम वांगचुक यांना त्यांच्या उपोषणा दरम्यान वीसव्या दिवशी पोलिसांनी सत्ताधिकारी पक्षाला बळी पडत वांगचुक यांची प्रकृती ढासळल्याचे कारण देत अचानक असंवैधानिक रित्या ताब्यात घेतले. त्यामुळे दिल्लीसह संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली. लोकशाही मार्गाने चालू असलेल्या शांत व संविधानिक मार्गाने चालू असलेल्या आंदोलन दडपण्यासाठी पोलीस प्रशासनाचा चुकीचा वापर करून सत्ताधिकारी मंडळी यांनी आंदोलन मोडीत काढण्याचे ठरविले, पण तत्पूर्वीच सोनम वांगचुक यांनी २० जुलै रोजी संपूर्ण देशवासीयांना संसदेला घेराव घालण्यासाठी जंतर-मंतरवर उपस्थित राहण्याचे आवाहन केले होते, त्याच आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी देशभरातील विद्यार्थी, राजकीय पक्ष, विविध संघटना व सर्वसामान्य नागरिक यांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.

पोलीस प्रशासन आंदोलन उधळून लावण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. अश्रूधुरांच्या नळकांड्या, लाठीचार्ज, अग्निशामक दलाचे बेधुंद पाण्याचा मारा करून आज हैदोस माजवला जात आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच संसदेच्या मुख्य प्रवेशद्वारावर देशातील तरुण विद्यार्थी व जनता मागण्या घेऊन ठाम उभे आहेत परंतु आजघडीला देशात उभे राहिलेल्या या विद्यार्थी आंदोलनाला दडपण्यासाठी जे व ज्या प्रकारे प्रयत्न केले जात आहेत त्यावरून आपण खरंच स्वतंत्र देशात आहोत का! अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय? लोकशाही जिवंत आहे का? हे प्रश्न पडत आहेत. देशाचे भविष्य असणाऱ्या या तरुण विद्यार्थ्यांना ह्या शिक्षण व्यवस्थेविरुद्ध का विद्रोह करावा लागला यावर चिंतन होणे गरजेचे आहे.

विद्रोह म्हणजे केवळ एखाद्या व्यवस्था, धोरण किंवा निर्णय याविरुद्ध केलेला विरोध नव्हे तर अन्याय व असमानता त्रुटी दूर करून सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी केलेली मागणी आहे. पेपर फुटी मुळे झालेल्या अन्यायासाठी न्याय म ागण्यासाठी हा विद्रोहाचा मार्ग स्वीकारण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आली. शिक्षण क्षेत्रातील हा विद्रोह विद्यार्थ्यांच्या समस्या ,शिक्षणातील असमानता, वाढती फी ,बेरोजगारी, अपुऱ्या सुविधा , ढिसाळ शिक्षण व परीक्षा व्यवस्थापन याविरुद्ध पुकारलेला बंड आहे. या विद्रोहा मागे व्यवस्था सुधारण्याची व अधिक न्यायक व प्रभावी शिक्षण प्रणाली निर्माण करण्याची अपेक्षा आहे. या विद्रोहामुळे समाज, शासन, शिक्षण व्यवस्था यांच्यावर यांच लक्ष या समस्याकडे वेढले गेले असले तरीही असले तरीही यामध्ये आवश्यक सुधारणा, नवनवीन धोरणे व केंद्रीय शिक्षण मंत्री यांच्या राजीनाम्यासह सकारात्मक बदल घडवून विद्रोहाला केवळ नकारात्मक दृष्टिकोनातून न पाहता परिवर्तन व प्रगतीसाठी ची एक लोकशाही प्रक्रिया म्हणून पाहणे गरजेचे आहे. विद्रोह हा केवळ विरुद्ध नसून समाजात आणि व्यवस्थेत आवश्यक बदल घडवून आणण्यासाठीची एक प्रभावी प्रक्रिया व मागणी आहे. प्रगत समाजाची निर्मिती विधायक विद्रोहातूनच अधिक न्यायक समतोल व प्रगत समाजाची निर्मिती होते. आजची ही शिक्षणविषयक विद्यार्थ्यांची आंदोलने ही केवळ विद्रोह नसून शिक्षण व्यवस्था अधिक दर्जेदार, निपक्षपाती व विद्यार्थी हिताची बनविण्याचा प्रयत्न आहे. हे आंदोलन शिक्षण व्यवस्थेतील बदलाला सकारात्मक चालना देऊन परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित, पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी हा विद्रोह क्रांतीचा पाऊल ठरावी हीच माफक अपेक्षा!

**-सौ. सुचिता वडजे (जोगदंड)**
नांदेड

## ‘स्वारातीम’ विद्यापीठाची ऐतिहासिक कामगिरी

# उस्मानिया विद्यापीठासाठी अत्याधुनिक माहिती व्यवस्थापन प्रणाली विकसित

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने देशातील १०९ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या उस्मानिया विद्यापीठ, हैदराबादसाठी अत्याधुनिक ‘विद्यापीठ माहिती व्यवस्थापन प्रणाली’ विकसित करून उच्च शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी नोंदविली आहे. ही प्रणाली १८ जुलै, २०२६ रोजी उस्मानिया विद्यापीठात अधिकृतपणे लोकार्पित करण्यात आली. या कामगिरीमुळे महाराष्ट्रातील दुसऱ्या विद्यापीठासाठी उद्योगमानक दर्जाची डिजिटल प्रणाली विकसित करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ ठरले आहे.



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली हा सल्लागार प्रकल्प विद्यापीठाच्या तज्ज्ञ पथकाने यशस्वीपणे पूर्ण केला. प्रकल्पाचे नेतृत्व डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी आणि डॉ. रुपाली एस. जैन यांनी केले.

या यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. आमच्या तज्ज्ञ पथकाने जागतिक दर्जाची तांत्रिक क्षमता सिद्ध केली आहे. राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाला नवी ओळख मिळवून देणाऱ्या डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. रुपाली एस. जैन आणि संपूर्ण पथकाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. भविष्यातही विद्यापीठ अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे देशातील शैक्षणिक संस्थांना तांत्रिक सहकार्य देत राहील.

प्रकल्प प्रमुख डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी म्हणाले, उस्मानियासारख्या देशातील प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक विद्यापीठासाठी ही प्रणाली विकसित करणे आमच्यासाठी मोठे आव्हान होते. मात्र, कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी दाखविलेला विश्वास, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि विद्यापीठ प्रशासनाचे सहकार्य यामुळे हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करता आला. ही केवळ सॉफ्टवेअर निर्मिती नसून, उच्च शिक्षणातील डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

नव्याने विकसित करण्यात आलेली ही माहिती व्यवस्थापन प्रणाली उस्मानिया विद्यापीठातील शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान व कार्यक्षम बनविणार आहे. सर्व महत्त्वाची कागदपत्रे डिजिटल स्वरूपात एका क्लिकवर उपलब्ध होणार असून, शिक्षक, विद्यार्थी आणि प्रशासनासाठी कामकाज अधिक सुलभ होणार आहे.

या लोकार्पण सोहळ्यास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांच्यासह उस्मानिया विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. कुमार मोलुगरम, कुलसचिव प्रा. जी. नरेश रेड्डी, कुलगुरूंचे विशेष कार्याधिकारी प्रा. एस. जितेंदरकुमार नाईक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालक प्रा. सिरीशा तसेच सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राचार्य आणि गुणवत्ता हमी कक्षाचे सदस्य उपस्थित होते.

या ऐतिहासिक कामगिरीमुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नवोपक्रम, डिजिटल उत्कृष्टता आणि स्वदेशी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर आपले वेगळे स्थान अधोरेखित केले असून, ‘डिजिटल भारत’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीतून बळकटी दिली आहे.ही मांडणी वृत्तपत्रीय शैलीत असून, बातमीचा प्रवाह कायम ठेवत कुलगुरू आणि डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांची प्रतिक्रिया नैसर्गिकरित्या समाविष्ट करण्यात आली आहे.

# महाभूसंपादन पोर्टलवरील ‘एलएडीआरए’ प्रणालीमुळे भूसंपादन अभिलेखांचे डिजिटल संरक्षण

## भूसंपादित जमिनींच्या नोंदींचे सुरक्षित जतन; १२ हजारांहून अधिक सातबारा नोंदी अद्ययावत

**नांदेड (प्रतिनिधी)–** पायाभूत सुविधा, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, जलसंधारण व इतर विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करण्यात येते. मात्र, भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवाडे, अधिसूचना, मोबदला वाटप प्रमाणपत्रे व इतर महत्त्वपूर्ण अभिलेखांचे जतन करणे अत्यंत जिकिरीचे ठरत होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी महाभूसंपादन पोर्टलवर भूसंपादन डिजिटल अभिलेख कक्ष (LDR Land cquisition Digital rchive Room) ही नाविन्यपूर्ण डिजिटल प्रणाली विकसित केली असून, भूसंपादित जमिनींच्या अभिलेख व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

‘LDR’ ही भूसंपादित शासकीय जमिनींच्या अभिलेखांचे अद्ययावतीकरण, सुरक्षित जतन आणि डिजिटल संग्रहासाठी विकसित करण्यात आलेली प्रभावी प्रणाली आहे. या प्रणालीमुळे भूसंपादन अधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख व तहसीलदार कार्यालय यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण झाला असून भूसंपादन प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान व कार्यक्षम झाली आहे.

पूर्वी अनेक प्रकरणांमध्ये भूसंपादन पूर्ण झाल्यानंतरही जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर नोंदी खाजगी व्यक्तींच्या नावावरच कायम राहत असल्याने शासकीय विकासकामे, पुनर्वसन प्रक्रिया व कायदेशीर कामकाजात अडचणी निर्माण होत होत्या. काही ठिकाणी भूसंपादित जमिनींची दुबार खरेदी-विक्री होऊन कायदेशीर वाद निर्माण होत होते. ‘LDR’ प्रणालीमुळे अशा प्रकारांना प्रभावी आळा बसला असून संबंधित शासकीय यंत्रणांच्या नावावर जमिनींच्या नोंदी तातडीने अद्ययावत करणे शक्य झाले आहे.

या प्रणालीच्या माध्यमातून आतापर्यंत १२ हजारांहून अधिक सातबारा नोंदी संबंधित शासकीय यंत्रणांच्या नावावर अद्ययावत करण्यात आल्या आहेत. तसेच ६०० हून अधिक कमी-जास्त पत्रके, १९ हजारांहून अधिक मोबदला वाटप प्रमाणपत्रे, २ हजार ३०० हून अधिक निवाड्यांच्या प्रती आणि वाढीव मोबदल्याच्या ५ हजारांहून अधिक प्रकरणांचे डिजिटायझेशन करण्यात आले आहे. संबंधित दस्तऐवज www. mahabhusampadan.com या संकेतस्थळावर कार्यकारी यंत्रणांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

यामुळे भूसंपादित जमिनींच्या अभिलेखांचे सुरक्षित जतन, संबंधित शासकीय विभागांच्या नावावर सातबारा नोंदींची अचूक नोंद, दुबार खरेदी-विक्रीला प्रतिबंध, कायदेशीर वाद टाळणे तसेच नागरिकांची फसवणूक रोखण्यास मोठी मदत होत आहे.

महाभूसंपादन पोर्टल हे केवळ संगणकीकरणाचे साधन नसून नागरिकाभिमुख आणि प्रशासनाभिमुख अशा दोन्ही स्तरांवर परिवर्तन घडवून आणणारे प्रभावी डिजिटल प्रशासनाचे मॉडेल ठरत आहे. नागरिकांना पारदर्शक, जलद व सुलभ सेवा उपलब्ध करून देणे आणि अधिकाऱ्यांना केंद्रीकृत व अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे हा या प्रणालीचा मुख्य उद्देश आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले की , डऊ ही भूसंपादन प्रक्रियेच्या अनुषंगाने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने नव्याने विकसित करण्यात आलेली अभिनव डिजिटल प्रणाली आहे.

# नागरिकांनी महाराजस्व समाधान शिबिरांचा लाभ घ्यावा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## जिल्ह्यात ३१ जुलैपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीच्या औचित्याने राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर’ अभियानाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात २२ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत विधानसभा मतदारसंघनिहाय समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, प्रत्येक मतदारसंघासाठी कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता जिल्हा प्रशासनाने नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने या समाधान शिबिरांमध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, विविध दाखल्यांचे वितरण तसेच इतर शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती, अर्ज स्वीकारणे तसेच नागरिकांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या विधानसभा मतदारसंघातील संबंधित समाधान शिबिरास आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. तसेच प्रलंबित प्रकरणे व तक्रारींचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

नांदेड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे : ८४-हदगाव : २७ जुलै २०२६, सकाळी १० वा., सुमन लॉन्स अँड गार्डन, हदगाव.

८६-नांदेड उत्तर : २६ जुलै २०२६, सकाळी १० वा., ए.के. संभाजी मंगल कार्यालय, वाडी (बु.), नांदेड.

८८-लोहा : ३१ जुलै २०२६, सकाळी १० वा., के. के. मंगल कार्यालय, लोहा.

# घराघरांत श्रावणबाळ घडले तर वृद्धाश्रमाची गरज नाही –डॉ. पी. डी. जोशी पाटोदेकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** घराघरांत श्रावणबाळ घडला तर वृद्धाश्रमाची गरज भासणार नाही. वृद्धाश्रम ही भारतीय संस्कृतीची परंपरा नाही हे खरे आहे. मात्र ज्यांना अपत्य नाही किंवा आधार नाही अशा ज्येष्ठांसाठी वृद्धाश्रम हा सन्मानजनक पर्याय आहे. त्यामुळे वृद्धाश्रम अधिक सक्षम, संवेदनशील व सुसज्ज असले पाहिजेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक डॉ. पी. डी. जोशी पाटोदेकर यांनी केले.

स्व. बसवंतराव मुंडकर विचार मंचच्या ‘बाबा तुमच्यासाठी...’ उपक्रमांतर्गत संध्याछाया वृद्धाश्रमात आयोजित समारोप कार्यक्रमात ते बोलत होते.



डॉ. जोशी म्हणाले, वृद्धांना निवारा-जेवणाबरोबरच प्रेम, संवाद व सन्मानाची गरज असते. समाजाने त्यांच्याकडे कृतज्ञतेच्या भावनेने पाहावे. स्व. मुंडकर यांच्या गोवा मुक्तिसंग्रामातील सहभागाची आठवणही त्यांनी करून दिली.

यावेळी त्यांच्या हे बंध समाजनिष्ठेचे ग्रंथाच्या पुरस्काराबद्दल सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. बालाजी कोम्पलवार, डॉ. शिवदास हमंद, डी. जी. पवार, गोविंद मुंडकर आदी उपस्थित होते. आभार इंजि. साहेबराव जाधव यांनी मानले.

## शासकीय ईबीसी मुलांच्या वसतिगृहात प्रवेशासाठी १० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतिगृह तथागत नगर, मालेगाव रोड नांदेड येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी पुनर/नूतन प्रवेशासाठी द्वितीय फेरीकरिता १ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. यानंतर आलेल्या अर्जाचा स्वीकार केला जाणार नाही. अचूक व परिपूर्ण अर्ज स्वीकारले जातील याची पालक व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन मातोश्री शासकीय ईबीसी वसतिगृहाचे गृहप्रमुख यांनी केले आहे.

विहित कालावधीत परिपूर्ण पुनर्प्रवेश/नूतन प्रवेशाचे अर्ज हे संबंधित विहित कागदपत्रासह स्वीकारण्यात येईल. पुनर्प्रवेश/नूतन प्रवेशाचे अर्ज कार्यालयात कार्यालयीन वेळेत १ ते १० ऑगस्ट २०२६ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून मिळतील. या कालावधीत परिपूर्ण भरलेले अर्ज कागदपत्रासह स्वीकारले जातील.

माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवीसाठी शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार निवासाची व भोजनाची विनामूल्य सोय करण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १० ऑगस्ट असून, यानंतर आलेल्या अर्जाचा स्वीकार केला जाणार नाही असे मातोश्री शासकीय ईबीसी वसतिगृह नांदेड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने ताब्यात घेतल्याचा निषेध



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय पिछड़ा शोषित संघठन, शाखा नांदेड व ओबीसी समन्वय समिती नांदेडच्या वतीने दिल्ली येथील सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना बेकायदेशीर ताब्यात घेतल्याचा निषेध व नीट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणी केंद्रिय मंत्री धर्मेन्द्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत व ईतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना देण्यात आले,

या वेळी ओबीसी समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष गोविंद फेसाटे, सचिव ॲड. प्रदीप राठोड, ओबीसी नेते प्रकाश राठोड, महाराष्ट्र ना. म. कर्म. जिल्हाध्यक्ष बी. वाय. काटकर, भारतीय पिछड़ा शोषित संघटनेचे महाराष्ट्र राज्य महासचिव लक्ष्मणराव लिंगापुरे, इंजि. के. घनचेकर, मनामचे जिल्हाध्यक्ष दत्ता चापलकर, एस. एम. बनसोडे, राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय सचिव गोविंदराम शुरनर, बीपीएसएसचे जिल्हाध्यक्ष सतिशचन्द्र शिन्दे, ओ. स. समितीचे उपाध्यक्ष पी. एम. कदम, तेली महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव क्षीरसागर, कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेश चिटकुलवार, ओबीसी प्रश्नांचे अभ्यासक व विचारवंत प्रा. डॉ.आर. डी. शिन्दे, प्रा. डॉ. मारोती लुटे, रवी चव्हाण, प्रा. डॉ. श्रीमंत राऊत, एन. एम. भालके, पी. डी. देवकते, डॉ. प्रा. गजानन वाघमारे व इतर जात समूहाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**पान १ वरून...**

**काँग्रेस कार्यालयावर येणाऱ्या...**

अंबादास रातोळे, नागराज सुलगेकर, प्रसेनजित वाघमारे, जेशिका शिंदे, ज्योती कदम, सुरेखा वैद्य, विमलताई किर्तने, अक्षय नळगे, नईम शेख, मुरली देशमुख, गोविंद पाटील, प्रकाश दिपके, अजहर शेख, प्रथमेश गिरी, कलिम शेख, सोनू पाटील, जगदीश पावडे आदींसह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------

**जिल्हा परिषद शाळेच्या...**

ग्रामपंचायत सदस्य जयवंत कांबळे, ग्रामसेवक प्रवीण रावळे, विनोद आडे, सुरेश राठोड, प्रभाकर मेश्राम यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. केंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पुढील वर्ग अंगणवाडीत भरवण्याच्या सूचना दिल्या.

ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत असलेली दुसरी वर्गखोली तत्काळ दुरुस्त करून देण्यात येईल, अशी ग्वाही सरपंच उत्तम मेश्राम यांनी दिली. शाळेच्या नवीन इमारतीसाठी शिक्षण विभागामार्फत शासनाकडे तातडीने निधीची मागणी केली जाईल, असे आश्वासन केंद्रप्रमुख राठोड यांनी दिले. घटनेची माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्ल राठोड यांनी केंद्रप्रमुखांशी संपर्क साधून माहिती घेतली.

# लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला १३ ऑगस्टपासून होणार सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)–** लाळखुरकूत या घातक विषाणूजन्य रोगापासून राज्यातील पशूधनाचे रक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे ‘लाळखुरकूत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-९’ चे आयोजन करण्यात आले आहे. ही लसीकरण मोहीम येत्या १३ ऑगस्ट २०२६ पासून राज्यभरात सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून प्राप्त झालेल्या १ कोटी लसमात्रा पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेच्या कोल्ड रूममध्ये शीत साखळी ठेवून सुरक्षितपणे वितरण करण्यात येत आहे.

लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम राज्यभरात वेळेत व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रत्यक्ष लसीकरण सुरू होण्यापूर्वी सर्व जिल्ह्यांपर्यंत लस साठा पोहोचणे आवश्यक आहे. उपलब्ध झालेला १ कोटी लसींचा पुरवठा राज्यातील सर्व जिल्ह्यांना शीत साखळीची खबरदारी घेऊन वितरित (वाटप) करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या लस वाटप प्रक्रियेचा सविस्तर जिल्हावार अहवाल मुख्य कार्यालयास तातडीने सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या मोहिमेमुळे राज्यातील कोट्यवधी पशूधनाला लाळखुरकत रोगापासून संरक्षण मिळणार असून, पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

परिणामकारक लसीकरण होण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुधनाचे जंतनिर्मूलन करण्यात येत असून, आवश्यक औषधींचा पुरवठा सर्व संस्थांना करण्यात आला आहे. महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना राष्ट्रीय गोकुळ अभियान अंतर्गत पशुधनाला एफएमडी लसीकरण करून त्याची नोंद NDLM² वर घेतल्यास प्रती पशुधन रु. ५ प्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.

राज्यातील पशुधन रोगांपासून सुरक्षित ठेवणे व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी ‘लाळखुरकत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-९’ अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये १३ ऑगस्टपासून ही मोहीम व्यापक स्वरूपात राबवली जाईल. सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे १००% लसीकरण करून घेऊन या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्याचे पशुवैद्यकीय आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. गजरूंनी सेवांसाठी व्हॉट्सॲप ९०६३१४२२९९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे कळविले आहे.

## शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या भोकर विधानसभाध्यक्षपदी मोहम्मद बुऱ्हाण



**मुदखेड (प्रतिनिधी)–** शिवसेना संघटना अधिक बळकट करण्यासह अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या नियुक्ती सोहळ्यात मोहम्मद बुऱ्हाण अब्दुल मजीद यांची भोकर विधानसभाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

शिवसेनेचे नेते तथा विधान परिषदेचे गटनेते आमदार हेमंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती सोहळा पार पडला. शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार सईद खान यांच्या सूचनेनुसार तसेच शिवसेना भोकर विधानसभा नेते व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इंजि. विश्वंभर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हाप्रमुख अनवर अहमद यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी मोहम्मद बुऱ्हाण अब्दुल मजीद यांची भोकर विधानसभा अध्यक्ष, शेख मुकीद शेख जानीमिया यांची मुदखेड तालुकाध्यक्षपदी, तर सय्यद जब्बार सय्यद जाफर यांची भोकर तालुकाध्यक्ष, शेख समीर शेख जैनुद्दीन यांची मुदखेड शहराध्यक्ष आणि शेख इब्राहिम यांची भोकर शहराध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

# नांदेड विभागाच्या विशेष तिकीट तपासणी मोहिमेत ५१९ विनातिकीट प्रवाशांवर दंडात्मक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात दि. २० जुलै २०२६ रोजी विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ३१ स्क्वॉड तिकीट तपासनीस (टीटीई) सहभागी झाले असून त्यांनी २७ गाड्यांची सखोल तपासणी केली. तपासणीदरम्यान सचखंड एक्स्प्रेस, देवगिरी एक्स्प्रेस, नंदिग्राम एक्स्प्रेस, पनवेल एक्स्प्रेस, हडपसर एक्स्प्रेस, तपोवन एक्स्प्रेस, काचिगुडा एक्स्प्रेस, रायचूर एक्स्प्रेस तसेच इतर महत्त्वाच्या गाड्यांमध्ये विशेष तपासणी करण्यात आली.



या मोहिमेत विनातिकीट प्रवासाची (TWT) २८५ प्रकरणातून २ लाख २ हजार ८६५ रुपये इतकी रक्कम वसूल करण्यात आली. तसेच अनियमित प्रवासाची १७ प्रकरणे नोंदवून११ हजार ७९० रुपये आणि बुक न केलेल्या सामानाची २१७ प्रकरणातून ३८ हजार १०५ इतकी रक्कम वसूल करण्यात आली.

एकूण ५१९ विनातिकीट/अनियमित प्रवासाची प्रकरणे निष्पन्न झाली असून भाडे व दंडापोटी एकूण २ लाख ५३ हजार १०५ इतकी रक्कम वसूल करण्यात आली.

दक्षिण मध्य रेल्वेचा नांदेड विभाग प्रवाशांना वैध तिकीट घेऊनच प्रवास करण्याचे आवाहन करीत आहे. विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी तसेच रेल्वेच्या महसुलाचे संरक्षण करण्यासाठी अशा विशेष तिकीट तपासणी मोहिमा यापुढेही नियमितपणे राबविण्यात येणार आहेत, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

## निराधार, निराश्रित बालकांना शैक्षणिक साहित्य व फळांचे वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** छावा श्रमिक संघटना मराठवाडा अध्यक्ष, जिजाऊ प्रतिष्ठानचे संचालक/अध्यक्ष तथा एनटीसीए प्रदेशाध्यक्ष भास्करराव हंबर्डे यांच्या वतीने निराधार, निराश्रित बालकांसाठी शैक्षणिक साहित्य, फळांचे वाटप करण्यात आले. तसेच वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच पौष्टिक आहाराचा संदेश देण्यासाठी फळांचे वितरण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

यावेळी शाम पाटील, सौ. सुरेखा चव्हाण, गजानन पवार, संतोष शिंदे, गवारकर, केशवराव जाधव, शिलानंद कांबळे तसेच अनेक विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळाली असून, समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करून भविष्यातही अशा सामाजिक कार्यांची गरज व्यक्त केली.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

## नेल पॉलिश खरेदी करण्यापूर्वी लेबलवरील या गोष्टी नक्की तपासा

# अन्यथा नखांचे होऊ शकते नुकसान!

**सुंदर आणि आकर्षक नखांसाठी नेल पॉलिश लावण्याची आवड अनेक महिलांना असते. मात्र, प्रत्येक नेल पॉलिश आपल्या नखांसाठी सुरक्षित असेलच असे नाही. काही नेल पॉलिशमध्ये कॅम्फर, फॉर्मेल्डिहाइड, झायलिन, टोल्युईन यांसारखी रसायने असतात. ही रसायने नखांसह त्वचेवर आणि शरीरातील हार्मोन्सवरही प्रतिकूल परिणाम करू शकतात. त्यामुळे नेल पॉलिश निवडताना त्यावरील लेबल आणि घटक (Ingredients) काळजीपूर्वक तपासणे आवश्यक आहे, असा सल्ला त्वचारोगतज्ज्ञांनी दिला आहे.**



### नेल पॉलिश सुंदर दिसते, पण अति वापर टाळा...

नेल पॉलिशमुळे हात अधिक आकर्षक दिसतात. मात्र, त्याचा सतत आणि अयोग्य वापर केल्यास नखे कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे केवळ योग्य रंग निवडणेच नव्हे, तर सुरक्षित आणि दर्जेदार नेल पॉलिश वापरणेही तितकेच महत्त्वाचे आहे. नेल पॉलिश नियमित लावणाऱ्यांनी नखांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे. नखांवर पांढरे डाग, पिवळसरपणा किंवा तडे दिसू लागल्यास काही दिवस नेल पॉलिश न लावता नखांना विश्रांती द्यावी.

### नेल पॉलिश खरेदी करताना या गोष्टी तपासा

5-Free, 7-Free किंवा 'Free From असे लेबल असलेली नेल पॉलिश निवडा. याचा अर्थ त्यामध्ये काही घातक रसायने नसतात. नेहमी विश्वासार्ह आणि नामांकित ब्रँडची उत्पादने खरेदी करा. शक्यतो वॉटर-बेस्ड किंवा Kids Safe असे लेबल असलेली नेल पॉलिश वापरा. जेल नेल पॉलिशचा वापर टाळा. ती राळ (Resin) पासून बनवली जाते आणि सुकवण्यासाठी अतिनील (UV) प्रकाशाची आवश्यकता असते. ॲक्रेलिक नेल पॉलिशमध्ये अनेकदा जड धातू (Heavy Metals) असतात. त्यामुळे ती संपूर्ण नखांवर न लावता केवळ नेल आर्टसाठी वापरणे अधिक सुरक्षित ठरते.

### या रसायनांपासून सावध राहा...

- फॉर्मेल्डिहाइड (Formaldehyde) : त्वचेची ॲलर्जी, खाज आणि जळजळ होऊ शकते.
- टोल्युईन (Toluene) : डोकेदुखी, चक्कर येणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात.
- डीबीपी (DBP - Dibutyl Phthalate) : हार्मोन्सच्या संतुलनावर परिणाम होऊ शकतो.
- कॅम्फर (Camphor) : नखे कोरडी आणि नाजूक बनू शकतात.
- फॉर्मेल्डिहाइड रेजिन : संवेदनशील त्वचेमध्ये ॲलर्जी निर्माण होऊ शकते.
- झायलिन (Xylene) : डोळ्यांची जळजळ आणि श्वसनास त्रास होऊ शकतो.
- इथाइल टोसिलामाइड (Ethyl Tosylamide) : याच्या सुरक्षिततेबाबत संशोधन सुरू आहे.

### नेल पॉलिश लावण्यापूर्वी...

- नखे स्वच्छ करा : जुनी नेल पॉलिश हायड्रेटिंग रिमूव्हरने काढा. नखांवर तेल किंवा घाण राहिल्यास नवीन नेल पॉलिश व्यवस्थित बसत नाही.
- नखांना योग्य आकार द्या : नखे कापून फाइल करा. क्युटिकल्स मऊ करून हलक्या हाताने मागे ढकला. त्यामुळे नेल पॉलिश नीट बसते.
- त्वचेला मॉइश्चरायझर लावा : नखाभोवतीच्या त्वचेवर तेल किंवा मॉइश्चरायझर लावा. मात्र, ते नखांच्या पृष्ठभागावर लागू देऊ नका.

### आपल्या त्वचेच्या अंडरटोननुसार नेल पॉलिश निवडा

- कूल अंडरटोन (सिल्व्हर दागिने अधिक शोभतात) : गुलाबी, निळे आणि बेरी शेड्स निवडा.
- वॉर्म अंडरटोन (गोल्ड दागिने अधिक शोभतात) : कोरल, ऑरेंज आणि वॉर्म रेड शेड्स योग्य ठरतात.
- न्यूट्रल अंडरटोन : जवळपास सर्व रंग आणि न्यूड शेड्स चांगले दिसतात.

### नेल पॉलिश लावण्याची योग्य पद्धत

- बेस कोट लावा : बेस कोटमुळे नखांवर संरक्षणाचा थर तयार होतो आणि नेल पॉलिश अधिक काळ टिकते.
- पातळ थरांमध्ये नेल पॉलिश लावा : एकाच वेळी जाड थर न लावता दोन ते तीन पातळ थर लावा. प्रत्येक थर पूर्ण सुकल्यानंतरच पुढचा थर लावा.
- टॉप कोट वापरा : टॉप कोटमुळे नेल पॉलिशचा चमकदारपणा टिकतो आणि ते लवकर निघत नाही.

### या चुका करू नका...

- घाणेरड्या नखांवर नेल पॉलिश लावणे.
- नेल पॉलिश नखाने खरवडून काढणे.
- अनेक दिवस सतत नेल पॉलिश लावून ठेवणे.
- ॲसिटोनयुक्त रिमूव्हरचा वारंवार वापर करणे.
- नखांवरील संसर्गाकडे दुर्लक्ष करणे.


# जवळच्या नात्यात विवाह टाळावा का?

## तज्ञांचा इशारा : मुलांमध्ये आनुवंशिक आजारांचा धोका वाढू शकतो

**विवाह हा आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा निर्णय मानला जातो. जीवनसाथी निवडताना स्वभाव, शिक्षण, करिअर आणि कुटुंबीय मूल्यांसोबतच आरोग्याशी संबंधित बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे. स्त्रीरोगतज्ज्ञ आणि वंध्यत्व तज्ज्ञांच्या मते, जवळच्या रक्ताच्या नात्यात विवाह केल्यास भावी संततीमध्ये काही आनुवंशिक (जेनेटिक) आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे अशा विवाहांबाबत योग्य माहिती आणि वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे आहे.**

### रक्ताच्या नात्यातील विवाह का टाळावेत?

डॉक्टर सांगतात की, चुलत किंवा मावस-आते-मामे अशा जवळच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तींमध्ये विवाह झाल्यास पती-पत्नी दोघेही एकाच आनुवंशिक दोषाचे (Genetic Mutation) वाहक (Carrier) असण्याची शक्यता अधिक असते. जर दोघेही एका विशिष्ट आनुवंशिक आजाराचे वाहक असतील, तर प्रत्येक गर्भधारणेमध्ये २५ टक्के शक्यता असते की बाळाला तो आनुवंशिक आजार होऊ शकतो. ५० टक्के शक्यता असते की बाळ स्वतः आजारी नसले तरी त्या आजाराचे वाहक (Carrier) असेल. २५ टक्के शक्यता असते की बाळ ना आजारी असेल, ना त्या आजाराचे वाहक असेल.



### अशा विवाहानंतर काय करावे?


जर जवळच्या नात्यात विवाह झाला असेल, तर घाबरण्याची गरज नाही. योग्य नियोजन आणि वैद्यकीय मार्गदर्शनामुळे धोका कमी करता येऊ शकतो. जेनेटिक काऊन्सेलिंग करून घ्या. कॅरिअर स्क्रीनिंग चाचणी करून दोघांची तपासणी करा. कुटुंबातील आनुवंशिक आजारांचा संपूर्ण वैद्यकीय इतिहास डॉक्टरांना सांगा.

### आधुनिक वैद्यकीय पर्याय उपलब्ध

जर तपासणीत दोघेही एका आनुवंशिक आजाराचे वाहक असल्याचे स्पष्ट झाले, तर आजच्या वैद्यकीय क्षेत्रात IVF (इन व्हिट्रो फर्टिलायझेशन) आणि PGT (Preimplantation Genetic Testing) यांसारखे पर्याय उपलब्ध आहेत. या तंत्रज्ञानाच्या मदतीने भ्रूणाची आनुवंशिक तपासणी करून निरोगी भ्रूणाची निवड करता येते. त्यामुळे आनुवंशिक आजार असलेल्या बाळाचा जन्म होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो.

### प्रत्येक बाळाला आजार होतोच असे नाही...

डॉक्टर स्पष्ट करतात की, रक्ताच्या नात्यात विवाह झाला म्हणजे प्रत्येक वेळी बाळाला आनुवंशिक आजार होणारच, असे अजिबात नाही. मात्र, सर्वसाधारण विवाहांच्या तुलनेत अशा प्रकरणांमध्ये आनुवंशिक आजारांचा धोका अधिक असू शकतो. तज्ज्ञांच्या मते, घाबरण्यापेक्षा योग्य माहिती मिळवणे आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार निर्णय घेणे अधिक महत्त्वाचे आहे. विवाहापूर्वी किंवा गर्भधारणेचे नियोजन करताना आवश्यक असल्यास जेनेटिक समुपदेशन आणि तपासण्या करून घेणे भविष्यातील जोखीम कमी करण्यास मदत करू शकते.



# श्रावणात फक्त सुवासीनच नाही, तर ऑफिसला जाणाऱ्या तरुणींनीही परिधान करा हिरवा सूट!

**श्रावण महिना सुरू होण्यासाठी आता अवघे काही दिवस शिल्लक आहेत. या पवित्र महिन्यात हिरव्या रंगाला विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. त्यामुळे अनेक महिला हिरव्या रंगाचे कपडे, विशेषतः सूट किंवा साडी परिधान करतात. विवाहित महिलांसोबतच अविवाहित तरुणीही सावनात हिरव्या रंगाचे कपडे घालून भगवान शंकराची पूजा करतात. जर तुम्ही यंदाच्या श्रावणासाठी नवीन हिरवा सूट शिवून घेण्याचा किंवा खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर काही ट्रेंडी आणि आकर्षक डिझाइन्स तुमच्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतात. हे डिझाइन्स केवळ सण-उत्सवासाठीच नव्हे, तर ऑफिस, कौटुंबिक कार्यक्रम आणि कॅज्युअल आउटिंगसाठीही योग्य आहेत.**

- अनारकली प्रिंटेड सूट : पारंपरिक लूकसोबतच एलिगंट स्टाइल हवी असेल, तर हलक्या फ्लोरल प्रिंट आणि नाजूक भरतकाम असलेला हिरवा अनारकली सूट निवडा. सुंदर नेकलाइन एम्ब्रॉयडरी आणि साधा दुपट्टा यामुळे हा लूक अधिक उठून दिसतो. हा सूट ऑफिस, पूजा, कौटुंबिक समारंभ किंवा मैत्रिणींसोबतच्या भेटीसाठीही उत्तम पर्याय आहे. सिल्व्हर झुमके, जुत्ती किंवा हलक्या हिल्ससोबत हा लूक अधिक आकर्षक दिसेल.
- शॉर्ट कुर्ता आणि शरारा सेट : नेहमीपेक्षा वेगळा आणि ट्रेंडी लूक हवा असेल, तर भरतकाम असलेला शॉर्ट कुर्ता आणि फ्लेअर शरारा सेट निवडा. स्लीव्हलेस डिझाइन, सुंदर भरतकाम आणि प्लीटेड शरारा यामुळे हा पोशाख आधुनिक आणि आकर्षक दिसतो. इच्छेनुसार अर्ध्या किंवा पूर्ण बाहींचाही पर्याय निवडता येतो. सिल्व्हर दागिने आणि ब्लॉक हिल्ससोबत हा लूक अधिक खुलून दिसेल.
- बनारसी दुपट्ट्यासोबत साधा सूट : साध्या हिरव्या सूटसोबत बनारसी दुपट्ट्याची जोड हा कधीही न कालबाह्य होणारा फॅशन ट्रेंड आहे. अर्ध्या किंवा तीन-चतुर्थांश बाहींचा कुर्ता, लेस डिटेलिंग असलेली पँट आणि सोन्याच्या जरीचा बनारसी दुपट्टा यामुळे साध्या पोशाखालाही राजेशाही स्पर्श मिळतो.



- फ्लोरल कुर्तीचा हटके अंदाज : संपूर्ण हिरवा सूट घालण्याऐवजी बॉटल ग्रीन रंगाच्या कुर्तीवर रंगीबेरंगी फुलांची नक्षी असलेली कुर्ती निवडू शकता. बॅलून स्लीव्ह्ज आणि फ्लोरल डिझाइनमुळे हा लूक अधिक ताजातवाना आणि स्टायलिश वाटतो.
- हँड-पेंटेड कुर्ता : हँड-पेंटेड फ्लोरल डिझाइन असलेला कुर्ता हा सध्या फॅशनमध्ये आहे. हलक्या किंवा गडद हिरव्या रंगावर विरोधी रंगातील फुलांची नक्षी अत्यंत आकर्षक दिसते. त्यासोबत साधी पँट, मॅचिंग दुपट्टा आणि मिनिमल दागिने परिधान केल्यास सुंदर आणि उठावदार लूक मिळतो.
- एम्ब्रॉयडेड शरारा सेट : राजेशाही आणि समृद्ध लूक हवा असल्यास हलक्या हिरव्या रंगाचा भरतकाम केलेला शरारा सेट उत्तम पर्याय आहे. कुर्ता, शरारा आणि दुपट्टा या तिन्हीवर केलेले सुंदर भरतकाम आणि गोल्डन वर्क या पोशाखाला खास आकर्षक बनवतात. चोकर नेकलेस आणि ब्रेसलेटसोबत हा लूक अधिक उठून दिसतो.
- कॉलर असलेला बेसिक कुर्ता : साधेपणातही स्टायलिश दिसायचे असेल, तर कॉलर असलेला हिरवा कुर्ता निवडा. बटन डिटेलिंग, तीन-चतुर्थांश बाही, कॉलरवरील नाजूक भरतकाम आणि हलक्या सिक्विन वर्कमुळे हा कुर्ता ऑफिससाठीही योग्य ठरतो. यासोबत साधा हिरवा दुपट्टा वापरल्यास लूक अधिक देखणा दिसतो.

### श्रावणासाठी फॅशन टिप्स



- हिरव्या रंगासोबत सिल्व्हर किंवा ऑक्सिडाइज्ड दागिने अधिक खुलून दिसतात.
- ऑफिससाठी हलक्या भरतकामाचा किंवा प्रिंटेड सूट निवडा.
- पूजा किंवा सणासाठी बनारसी दुपट्टा किंवा शरारा सेट उत्तम पर्याय ठरतो.
- अतिशय जड मेकअपऐवजी नैसर्गिक आणि हलका मेकअप निवडल्यास एथनिक लूक अधिक उठून दिसतो.
- जुत्ती, कोल्हापुरी चप्पल किंवा ब्लॉक हिल्सची जोड दिल्यास संपूर्ण पेहराव अधिक आकर्षक वाटतो.

# ऑफिसच्या तणावामुळे वैवाहिक नात्यात दुरावा?

## काम करणाऱ्या दांपत्यांसाठी 7 मिनिटांचा 'नियम' ठरू शकतो उपयुक्त!

**आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत व्यावसायिक जबाबदाऱ्यांचा ताण इतका वाढला आहे की अनेक काम करणाऱ्या दांपत्यांना एकमेकांसाठी वेळ काढणेही कठीण होत आहे. परिणामी, नात्यात दुरावा, किरकोळ कारणांवरून वाद आणि मानसिक तणाव वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत तज्ञांनी सुचवलेला ७ मिनिटांचा नियम (7-Minute Rule) नातेसंबंध अधिक सुदृढ ठेवण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.**



### काय आहे 7 मिनिटांचा नियम?

ऑफिसमधून घरी परतताना अनेकजण कामाचा ताण, थकवा आणि चिडचिड सोबत घेऊन येतात. त्यामुळे घरात प्रवेश करताच छोट्या-छोट्या गोष्टींवरून मतभेद निर्माण होऊ शकतात. ७ मिनिटांचा नियम म्हणजे ऑफिसमधून घरी येण्याच्या संक्रमणाच्या (Transition) काळातील पहिली सात मिनिटे जाणीवपूर्वक सकारात्मक ठेवणे. या वेळेत कामाचा ताण, तक्रारी, वाद, मोठ्या मागण्या किंवा नकारात्मक चर्चा टाळण्याचा सल्ला दिला जातो.

### हा नियम कसा पाळावा?

- ऑफिसमधून घरी येताना काही क्षण शांतपणे स्वतःसाठी काढा.
- दीर्घ श्वास घ्या आणि दिवसभराचा ताण मनातून दूर करण्याचा प्रयत्न करा.
- श्वास सोडताना ऑफिसमधील तणाव मागे सोडल्याची मानसिक कल्पना करा.
- घरी पोहोचल्यावर जोडीदाराचे हसतमुखाने स्वागत करा.
- पहिल्या सात मिनिटांत टीका, तक्रार किंवा वादग्रस्त विषय टाळा.
- जोडीदाराबद्दल कृतज्ञता आणि आपुलकी व्यक्त करा.
- कुटुंबासोबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यावर भर द्या.
- अशा छोट्या सवयींमुळे घरात प्रवेश करताना मनातील थकवा आणि चिडचिड कमी होऊन प्रेम, आदर आणि जवळीक वाढण्यास मदत होऊ शकते.

### 7 मिनिटांच्या नियमाचे फायदे

- पती-पत्नीमधील संवाद अधिक सकारात्मक होतो.
- व्यावसायिक आयुष्यामुळे निर्माण होणारा भावनिक दुरावा कमी होण्यास मदत होते.
- दिवसाचा ताण आणि मानसिक थकवा कमी करण्यास सहाय्य होते.
- घरातील वातावरण अधिक शांत आणि आनंदी राहते.
- नात्यात विश्वास, आपुलकी आणि भावनिक बांधिलकी मजबूत होते.
- मानसिक आरोग्य आणि वैवाहिक नाते दोन्ही अधिक संतुलित राहण्यास मदत मिळू शकते.



# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राजभवन व विधानभवनात आदरांजली

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राजभवन, विधान भवन व मंत्रालयात विविध मान्यंवरांनी भावपूर्ण आदरांजली वाहून अभिवादन केले.



**राजभवनातही अभिवादन**

दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज लोकभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे; तसेच लोकभवनातील अधिकारी, कर्मचारी आणि तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.



**विधान भवनात अभिवादन**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आज विधान भवन येथे त्यांच्या प्रतिमेस विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आमदार शिवाजीराव गर्जे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे, सचिव-४ शिवदर्शन साठ्ये, सहसचिव राजेश तारवी, उपसचिव विजय कोमटवार, (संचालक, वि.स.पागे), संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

**मंत्रालयात मान्यवरांकडून आदरांजली**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आज मंत्रालयात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आमदार जयंत आसगावकर, आमदार शिवाजीराव गर्जे, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख आदींसह उपमुख्यमंत्री कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दिवंगत पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी निलेश हरड, यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# आंध्र प्रदेशात कोरोनाचे ७ नवे रुग्ण, संख्या २६ वर

**अमरावती (प्रतिनिधी)** – आंध्र प्रदेशात कोरोना विषाणूचे नवे रुग्ण आढळल्याने आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. मंगळवारी राज्यात कोविड-१९ चे ७ नवे रुग्ण नोंदविण्यात आले. या नव्या रुग्णांमुळे राज्यातील एकूण सक्रिय आणि नोंदविलेल्या रुग्णांची संख्या २६ वर पोहोचली आहे. आरोग्य विभागाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, मंगळवारी आढळलेल्या ७ नव्या रुग्णांपैकी सर्वाधिक ४ रुग्ण गुंटूर जिल्ह्यातून नोंदविण्यात आले आहेत. याशिवाय, पूर्व गोदावरी जिल्ह्यात २ तर बापटला जिल्ह्यात १ रुग्णाची पुष्टी झाली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे संसर्ग वेगवेगळ्या ठिकाणी आढळले असून त्यांचा कोणत्याही मोठ्या समूह किंवा क्लस्टर उद्रेकाशी थेट संबंध आढळलेला नाही. राज्यात आतापर्यंत नोंदविण्यात आलेल्या २६ रुग्णांपैकी १० जणांची प्रकृती लक्षात घेऊन त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर ९ रुग्ण घरगुती विलगीकरणात राहून डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेत आहेत.

याशिवाय, दिलासादायक बाब म्हणजे ३ रुग्ण पूर्णपणे बरे झाले असून त्यांना घरी सोडण्यात आले आहे. मात्र, राज्यात आतापर्यंत ४ रुग्णांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी नोंद आहे.

# अनंतनाग येथील लाल चौकात दहशतवादी हल्ला, गोळीबारात पोलीस हेड कॉन्स्टेबलला वीरमरण

**श्रीनगर (वृत्तसंस्था)** – जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील लाल चौकामध्ये दहशतवादी हल्ला झाला असून, दहशतवाद्यांन केलेल्या गोळीबारात एका पोलीस हेड कॉन्स्टेबलला वीरमरण आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार दहशतवाद्यांनी लाल चौक परिसरात तैनात पोलिसांच्या पथकावर दुपारी १२.३० च्या सुमारास गोळीबार केला. दरम्यान, या घटनेमुळे दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे.



दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात वीरमरण आलेल्या पोलीस हेड कॉन्स्टेबलचं नाव आशिक हुसेन असं असून, ते बडगाम जिल्ह्यातील बीरवाह येथील रहिवासी होते. दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात गंभीर जखमी झाल्यानंतर त्यांना त्वरित अनंतनाग येथील गव्हर्मेंट मेडिकल कॉलेज रुग्णालयात नेण्यात आले. मात्र गंभीर जखमी झालेल्या हुसेन यांचं उपचारांदरम्यान निधन झाले.

या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी परिसराला घेराव घातला असून, हल्लेखोर दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. तसेच परिसरात अतिरिक्त जवानांना तैनात करण्यात आले आहे. त्याबरोबरच शोधमोहीम सुरू असल्याने परिसरात कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयात स्व. अजितदादा पवार यांची जयंती साजरी

**अहमदपूर (प्रतिनिधी)** – येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांची ६७ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, महात्मा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने मराठी साहित्याचे ज्येष्ठ समीक्षक तथा प्रसिद्ध कादंबरीकार प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रो. डॉ. दुर्गादास चौधरी हे होते तर भूगोल विभाग प्रमुख डॉ. डी. एन. माने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रो. डॉ. पांडुरंग चिलगर यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे सह कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. सतीश ससाणे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिल्लीत प्रतिभा पवार-सोनिया गांधी यांची भेट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांनी आज काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांची दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी आपल्या सोशल मीडियातून माहिती दिली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, दोन उल्लेखनीय महिला - कणखर, दयाळू आणि खऱ्या अर्थाने सन्माननीय. त्यांची सहनशीलता, शहाणपण आणि अढळ जिद्द त्यांना ओळखणाऱ्या प्रत्येकाला आजही प्रेरणा देत आहेत.



संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरु आहे. यानिमित्तानं शरद पवार नवी दिल्लीत पोहोचले आहेत. काल शरद पवार यांनी कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरु असलेल्या जंतर मंतरवर अभिजीत दिपके यांची भेट घेतली. या भेटीत शरद पवार यांनी विद्यार्थ्यांचं नीट परीक्षेतील त्रुटींबाबत सुरु असलेल्या आंदोलनाची माहिती घेतली. यानंतर शरद पवार, सुप्रिया सुळे यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

शरद पवार यांनी या भेटीसंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करुन माहिती दिली आहे. ते म्हणाले की नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी केलेले आंदोलन, त्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून विद्यार्थ्यांना देण्यात आलेली अयोग्य वागणूक, विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे, तसेच देशातील आणि महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील प्रशासकीय व धोरणात्मक त्रुटी, शेतकऱ्यांच्या गंभीर समस्या व विविध प्रलंबित मागण्या या गंभीर विषयांवर चर्चा करण्यासाठी आज देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली.

# बिहारमध्येही दिल्ली पोलिसांची सेम टू सेम कॉपी; आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांकडून लाठीचार्ज

**पाटणा (प्रतिनिधी)** – बिहारमध्ये मुख्यमंत्री निवासस्थानाबाहेर नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला. पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना मारहाण केली. आंदोलनादरम्यान, अनेक विद्यार्थी रस्त्यावर झोपले, ज्यांना पोलिसांनी फरफटत नेले. त्यांना वाहनांमध्ये जबरदस्तीने बसवले. यापूर्वी, पोलिसांनी डाकबंगला चौकात विद्यार्थ्यांना बॅरिकेड्स लावून अडवले होते. सुमारे एक तासभर, विद्यार्थ्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली आणि बॅरिकेड्सवर चढले. पोलिसांनी त्यांना पांगून जाण्यास वारंवार सांगितले, पण त्यांनी नकार दिला. विद्यार्थ्यांना हटवण्यासाठी सीआयएसएफ आणि सीआरपीएफला पाचारण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्स तोडून राजभवनाच्या दिशेने कूच केले.

डाकबंगला चौकातून बाहेर पडणाऱ्या भाजप नेत्यांच्या वाहनांवरही आंदोलकांनी हल्ला केला. एका आमदाराला जीव वाचवण्यासाठी पळून जावे लागले. आंदोलनादरम्यान पाटणा पोलीस महानिरीक्षकांच्या सुरक्षा वाहनावर हल्ला झाला. आंदोलकांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक (एसपी) यांच्यासमोर टाळ्या वाजवल्या. यापूर्वी, पोलिसांनी विद्यार्थ्यांना जेपी गोलंबर येथे थांबवले होते, परंतु त्यांनी तेथील बॅरिकेड्स तोडून डाक बंगल्यापर्यंत मजल मारली. जेपी गोलंबर येथे विद्यार्थ्यांना थांबवण्यासाठी पोलिसांनी पाण्याचे फवारे, अश्रुधूर आणि लाठीचार्जचाही वापर केला. असे असूनही, त्यांनी रस्त्यावर बसून आंदोलन सुरूच ठेवले. विद्यार्थ्यांनी सकाळी गांधी मैदानावरून राजभवनाकडे मोर्चा काढला.

विद्यार्थिनी मनीषा म्हणाली, आम्ही नीट पेपरफुटी, बिहारमधील एईडीओ पेपरफुटी आणि टीआरई ४ अधिसूचनेविरोधात आवाज उठवत आहोत. हे सरकार कोणाचेही ऐकत नाही. ते हुकूमशाही बनले आहे. आम्ही धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करतो. पाटणा विद्यापीठाची विद्यार्थिनी सबा आफ्रिन म्हणाली, दिल्लीतील जंतर मंतरवर २१ दिवसांपासून काय चालले आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, एनटीए बरखास्त करावी आणि आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांप्रति थोडी सहानुभूती दाखवावी, अशी सर्वांची मागणी आहे.

# ट्रम्प यांचा '२००% टॅरिफ बॉम्ब', भारतीय औषध उद्योगासमोर आव्हान

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पयांनी जेनेरिक औषधांच्या आयातीबाबत केलेल्या नव्या घोषणेने जागतिक औषध उद्योगात मोठी खळबळ उडाली आहे. अमेरिकेत आयात होणाऱ्या जेनेरिक औषधांवर टप्प्याटप्प्याने २०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क (टॅरिफ) लागू करण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे.

या निर्णयाचा सर्वाधिक फटका भारताला बसण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, भारताच्या अब्जावधी डॉलरच्या औषध निर्यातीपुढे मोठे आव्हान निर्माण होऊ शकते. हा निर्णय घेताना ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, १ ऑगस्ट २०२६ पासून पुढील दोन वर्षे जेनेरिक औषधांवर कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. या कालावधीत कंपन्यांना अमेरिकेत उत्पादन प्रकल्प उभारण्याची संधी दिली जाईल. त्यानंतर एका वर्षासाठी १०० टक्के टॅरिफ, तर पुढील टप्प्यात २०० टक्के टॅरिफ लागू करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. अमेरिकेत उत्पादन न करणाऱ्या कंपन्यांना या वाढीव शुल्काचा फटका बसणार असल्याचेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले. अमेरिका ही भारतीय औषध उद्योगासाठी सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ आहे. भारतातून दरवर्षी सुमारे ९.७ अब्ज डॉलर किमतीची जेनेरिक औषधे अमेरिकेला निर्यात केली जातात.


## Change In Name

My Old Name is **NAZAMABEGUM AHEMAD SHAIKH** which now I am Changing as New Name **SHAIKH NAJMA SHAIKH AHEMAD.** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address -** AT POST POTA BK TQ HIMAYATNAGAR DISTRICT NANDED MAHARASHTRA -431802

## Change In Name

My Old Name is **SHAIKH ALTAF SHAIKH RAHIMAN** which now I am Changing as New Name **SHAIKH ALTAF SHAIKH ABDUL RAHEMAN** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address -** H.No. 198 Ayesha Bagh Eidgah Road, Vtc Itwara Nanded 431604
Cell No: 9850403400

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED UMAR** which now I am Changing as New Name **MOHAMMED UMAR AHMED** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address -** H.No.7-1-8 Itwara Bazar Nanded, 431604
Cell No: 9960183901

## टी.सी. हरवली

माझी सय्यदा आसमा माहिन या नावाची बारावी (विज्ञान) पासची टी.सी. देगलूर नाका ते विष्णुपुरी प्रवास करीत असताना हरवली आहे. जर कुणास आढळली असल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क -
सय्यदा आसमा माहिन
रा. देगलूर नाका, नांदेड
मो.नं. ९८२२३११९५८


## कागदपत्रे हरवले

माझी श्रीमती सो.गो. लोखंडे यांचे बारावीचे मार्कमेमो व शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र अकोला ते नांदेड प्रवास करीत असताना हरवली आहे. जर कुणास आढळली असल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क -
C/o. मारोती शिंदे, जागृत हनुमान मंदिराजवळ, ओंकारेश्वर नगर, तरोड (बु.) मो.नं. ९५५२२८८३०७

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## टी.सी. हरवली

माझी बालाजी वैजनाथ मैंद या नावाची बारावी पास शाखा कॉमर्स टि.सी.व ईतर कागदपत्रे असलेली बँग वर्कशॉप ते छत्रपती चौक टो प्रवास दरम्यान हरवली आहे. मिळाल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.

- संपर्क -
मोबाईल नंबर ९०२१६६३०८६, ९१५८६१४२८२

## टी.सी. हरवली

माझी शुभम मोहन नाईके या नावाची दहावी पासची टी. सी. मंगल सांगवी ते नांदेड प्रवास करताना हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

-: संपर्क पत्ता :-
शुभम मोहन नाईके
श्रीनगर, नांदेड
मो.नं. ८३९००४३४५७


## जाहीर प्रगटन

आमचे अशील यांनी दिलेल्या माहितीवरुन, अधिकारावरून व दाखविण्यात आलेल्याकागदपत्रांनुसार सदर जाहीर प्रगटनाद्वारेतमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत ही तिचे विद्यमान मालककु. अंकिता संभाजी पवार, वश्री. कैलास देवरावपवारदोघेहीरा. आलुवडगाव ता. नायगाव (खै.) जि. नांदेड.यांच्या मालकीची व वाहिवाटीची असून, त्या मिळकती पैकी काही मिळकत म्हणजेच ०० हे. १८.७३ आरज्याचे विस्तृत वर्णन खाली परिशिष्ट मध्ये दिले असे , ही मिळकत आमचे अशीलश्री राजेश संभाजी पवार व सौ पूनम राजेश पवार , दोघेहीरा. १/४/८६ भाग्यलक्ष्मी निवास ,फुलेनगर नांदेड, ता.नांदेड, जि.नांदेड.यांना सदर मिळकत कायमस्वरूपी विक्री करण्याचे ठरविले असून त्याबाबत इसार/ अनामत रक्कम स्वीकारलेली आहे.

सदर मिळकत निर्विवाद, निर्बोजा व निर्वेधअसल्याचा, कोणाशी विक्री केलेली नसल्याबाबत, तसेच कोणत्याही कोणत्याही बँक, वित्तीय संस्था, पतसंस्था किंवा सावकार यांचेकडेगहाण ठेवली नसल्याचा भरवसा व विश्वास त्यांनी आमच्या अशीलांना दिलेला आहे.

तरी सदर जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सूचित करण्यात येते की , सदर परिशिष्ट मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, ताबा, करार, साठेखत, भाडेपट्टा (लीज), तारण, गहाण, बक्षीसपत्र, पोटगी, न्यायालयीन दावा इत्यादी कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून७ दिवसांच्या आतआपला काही आक्षेप असल्यास आपण वैध कागदपत्रांसह कळवावे व आमची खात्री पटवून द्यावी.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्विवाद व निर्बोजा असल्याचे गृहीत धरून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दावा, हरकत किंवा आक्षेपास आम्ही अथवा आमचे अशील जबाबदार राहणार नाही..

मिळकतीचे परिशिष्ट

मे दुय्यम निबंधक साहेबनायगावयांच्या हद्दीतील मौजेआलुवडगाव ता. नायगाव (खै.) जि. नांदेड. येथील जमीन गट नंबर २२ क्षेत्र ०० हे. ६१ आर पैकी ०० हे. १८.७३ आर , ज्याचे एकूण क्षेत्रफळ १८९४.८८ चौ. मी. असून ज्याची सरासरी लांबी पूर्व-पश्चिम ४७.६१ मीटर व सरासरी रुंदी उत्तर-दक्षिण ३९.८० मीटरअसून, यांसी चतु:सीमा- पूर्वेस - अंकिता पवार यांची उर्वरित जमीन, दक्षिणेस - मेन रोड, पश्चिमेस - कैलास पवार यांची उर्वरित जमीन, उत्तरेस - नामदेव पवार यांचे शेत .

करिता सदरचे जाहीर प्रगटन दिले.

**गणेश को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर, नांदेड.**

**जाहिर प्रगटन**

दि. २० /०७/२०२६

गणेश को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर, नांदेडचे. प्लॅट व भागधारक सभासद श्री किरण गोपाळराव फुटाणे यांच्या नावे संस्थेत असलेला प्लॉट नं. ३६ ( ५० X ७२ - ३६०० चौ. फुट ) सर्व्हे नं. ८ जंगमवाडी विस्तारीत गणेशनगर, त्यांनी केलेल्या नियमीत हस्तांतराच्या विनंती अर्जा नुसार त्यांचा प्लॉट नं. ३६ सर्व्हे नं. ८ जंगमवाडी विस्तारीत गणेशनगर, नांदेड. हा त्यांचे स्नेही श्री श्रीकांत उत्तमराव जाधव यांच्या नावे नियमीत हस्तांतरण / वर्ग करण्यासाठी केलेल्या विनंती अर्जावर संस्था येणा-या संचालक मंडळाच्या सभेत निर्णय घेणार आहे. प्लॉट नं. ३६ सर्व्हे नं. ८ जंगमवाडी विस्तारीत गणेशनगर, नांदेड. (ज्याची लांबी ५० फुट X रुंदी ७२ फुट एकुण क्षेत्रफळ ३६०० चौ. फुट आहे.)

ज्याची चतु:सिमा - पुर्वेस :-सार्वजनिक रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट नं. ९,
दक्षिणेस :- सार्वजनिक रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. ३७,

या चतु:सिमेतील प्लॉट नं. ३६ (सर्व्हे नं. ८ जंगमवाडी विस्तारीत गणेशनगर, नांदेड.) हा श्री श्रीकांत उत्तमराव जाधव यांच्या नावे हस्तांतर करण्यात येणार आहे.

तरी वरील हस्तांतरण व दर्शविलेल्या जाहिर प्रगटना बाबत संबंधीत अर्जदाराचे नातेवाईक, इतर वारसदार व हितसंबंधी (बँक, वित्तपुरवठा करणा-या संस्था, इतर कोणास) कांही आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाच्या आत पुराव्यासह आक्षेप संस्थेच्या कार्यालयात सादर करावा. अन्यत: त्यानंतर आलेले कुठलेही आक्षेप किंवा उजर आल्यास ग्राह्यधरल्या जाणार नाही.

सदरील अर्ज मंजुर करून अर्जदाराने केलेल्या विनंती अर्जानुसार प्लॉट हस्तांतर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

जाहिर प्रगटन देणार

सचिव
यशवंत देशमुख
(किल्लेवडगावकर)

अध्यक्ष
विजय गंभीरे

गणेश को.-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर, नांदेड

**जाहीर प्रगटन**

**बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व.स्तर ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १४२/२०२६ — पुढील तारीख – १२.०८.२०२६

अर्जदार : १. पद्मीनबाई भ्र. दादाराव बंडगर , वय- ५२ वर्षे, धंदा - शेती,
२. रवीकांत पि.नरसिंग बंडगर , वय- १५ वर्षे, अज्ञान आजी पद्मीनबाई भ्र. दादाराव बंडगर ,
३. रनवीर पि.नरसिंग बंडगर , वय- १३ वर्षे, अज्ञान आजी पद्मीनबाई भ्र. दादाराव बंडगर ,
सर्व रा. बिजूर ता.बिलोली जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

**विषय- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हे मयत नरसिंग पि.दादाराव बंडगर यांचे कायदेशीर वारस असून मयत नरसिंग पि.दादाराव बंडगर यांचे अर्जदार ०१ ही आई असून अर्जदार क्र ०२ व ०३ ही मयत नरसिंग पि.दादाराव बंडगर त्यांचे मुले आहेत मयत नरसिंग पि.दादाराव बंडगर यांचा मृत्यु दिनांक २२.१२.२०२५ रोजी झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार यांना मयत नरसिंग पि.दादाराव बंडगर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०७/२०२६ रोजी माझ्या [illegible] शिक्यानिशी दिले.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली.

आदेशावरून,
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली.

**जाहीर प्रगटन**

**बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व.स्तर ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १२९/२०२६ — पुढील तारीख – ०१.०८.२०२६

अर्जदार : १. सुलोचना प्रकाश प्रांचंड , वय- ४९ वर्षे, धंदा - घरकाम,
२. अंकितकुमार प्रकाश प्रांचंड , वय-३० वर्षे, धंदा - शिक्षण ,
३. मनिषा प्रकाश प्रांचंड , वय-२७ वर्षे, धंदा - शिक्षण
अर्जदार १,२,३ रा. येसगी कार्ला कालम बिलोली ता.बिलोली जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

**विषय- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हे मयत प्रकाश गंगाराम प्रांचंड यांचे कायदेशीर वारस असून मयत प्रकाश गंगाराम प्रांचंड यांचे अर्जदार क्र. ०१ ही कायदेशीर पत्नी असून अर्जदार क्र ०२ हा मुलगा व अर्जदार क्र ०३ ही मुलगी आहे. मयत प्रकाश गंगाराम प्रांचंड यांचा मृत्यु दिनांक १५.१०.२०२४ रोजी झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार यांना मयत प्रकाश गंगाराम प्रांचंड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/०७/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली.

आदेशावरून,
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## 'नीट' पेपरफुटीच्या निषेधार्थ नायगाव काँग्रेसचा एल्गार; केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**नायगाव (प्रतिनिधी)** – 'नीट'-२०२६ पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ बुधवारी नायगाव येथे काँग्रेसच्यावतीने एल्गार पुकारण्यात आला. यावेळी आंदोलकांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

केंद्र सरकारविरोधात काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी तहसील कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले.

काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांना न्याय द्या, पेपरफुटी प्रकरणी जबाबदारांवर कठोर कारवाई करा, लोकशाहीचा गळा घोटणे बंद करा, अशा घोषणा देत केंद्र सरकारच्या भूमिकेवर तीव्र टीका केली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या घटनांची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.



नायगावचे तहसीलदार यांच्यामार्फत राष्ट्रपतींना पाठविण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नीट-२०२६ पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून, अनेक विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागला. तसेच दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जचा निषेध व्यक्त करण्यात आला. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गेलेले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, खा. प्रा. रवींद्र चव्हाण यांच्यासह इतर खासदारांवर करण्यात आलेल्या कारवाईचाही काँग्रेसने निषेध नोंदविला.

याप्रसंगी तालुकाध्यक्ष गंगाधर बेलकर यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संवेदनशीलतेने निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही प्रकाराला काँग्रेस पक्ष कदापि सहन करणार नाही. मागण्या मान्य न झाल्यास राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला.

या आंदोलनात नगराध्यक्ष प्रतिनिधी संजय चव्हाण, शहराध्यक्ष पांडुरंग चव्हाण, नगरसेवक पंकज चव्हाण, श्रीकांत चव्हाण, नारायण जाधव, विठ्ठल बेळगे, गणेश नायगावकर, रविंद्र भालेराव, शहराध्यक्ष साईनाथ चन्नावार, नारायण मद्देवाड, विजय भालेराव, तालुका उपाध्यक्ष संभाजी शिंदे, संदीप रातोळीकर, संभाजी मरवाळीकर, विनोद गडगेकर, अभिजीत मंगरुळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. आंदोलना दरम्यान काही अनूचित प्रकार घडू नये म्हणून बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर, पोलीस निरीक्षक मोहन भगत, सपोनि विजय जाधव, सपोनि विक्रम हराळे यांनी चोख बंदोबस्त लावला होता.

## शालेय पोषण आहार; अन्नसुरक्षा नियमांचे पालन अनिवार्य

### मुख्याध्यापकांनी एफओएससीओएस प्रमाणपत्र तातडीने घ्यावे

**नांदेड (मनोहर कदम)** – राष्ट्रीय शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सुरक्षित, सकस आणि दर्जेदार आहार मिळावा तसेच अन्नसुरक्षा व मानके कायदा-२००६ आणि अन्नसुरक्षा व प्रमाणीकरण नियमांचे काटेकोर पालन व्हावे, या उद्देशाने नांदेड तालुक्यातील पात्र प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची कार्यशाळा नुकतीच नागार्जुना पब्लिक स्कूल येथे पार पडली. कार्यशाळेत अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त सुनील जिंतूरकर यांनी मुख्याध्यापकांना अन्नसुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी शाळांनी एफओएससीओएस पोर्टलवरून अन्नसुरक्षा नोंदणी व प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळांनी अन्नसुरक्षा नियमांचे पालन करणे आवश्यक असून, त्यासाठी अन्नसुरक्षा प्रमाणपत्र घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नांदेड तालुक्यातील पात्र शाळांच्या मुख्याध्यापकांनी foscos.in या संकेतस्थळावरून आवश्यक प्रमाणपत्र मिळवावे, तसेच नोंदणी प्रक्रियेदरम्यान काही अडचणी आल्यास थेट सहायक आयुक्त सुनील जिंतूरकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले.

कार्यशाळेला अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त सुनील जिंतूरकर, अन्नसुरक्षा अधिकारी शिल्पा श्रीरामे, जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे लेखाधिकारी निळकंठ पाचंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी नांदेड गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांनी प्रास्ताविक करून कार्यशाळेच्या उद्देशाची माहिती दिली.

मार्गदर्शन करताना सुनील जिंतूरकर यांनी राष्ट्रीय शालेय पोषण आहार योजनेतील प्रत्येक सूचनेचे काटेकोर पालन करण्यावर भर दिला. शाळेच्या परिसरापासून सुरक्षित अंतरावर अन्न शिजविण्यात यावे, महिला बचत गट, महिला मंडळ किंवा इतर पुरवठादारांनी निर्धारित



वेळेत ताजे आणि स्वच्छ अन्न शाळेत पोहोचवावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी रुजविण्यावर विशेष भर देत त्यांनी जेवणापूर्वी आणि जेवणानंतर हात स्वच्छ धुणे, वाढलेली नखे वेळेवर कापणे, ताट-वाट्या स्वच्छ धुऊन वापरणे, अन्न वाया किंवा सांडणार नाही याची काळजी घेणे, अशा बाबींचे पालन करण्याचे आवाहन केले.

याशिवाय स्वयंपाकी आणि मदतनीस यांनी स्वच्छ कपडे परिधान करणे, त्यांची वैद्यकीय तपासणी झालेली असून ते आरोग्यदृष्ट्या तंदुरुस्त असल्याची खात्री करूनच त्यांना कामावर ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अन्न स्वच्छ आणि सुरक्षित वातावरणात शिजवावे, स्वयंपाकाच्या ठिकाणी माशी, झुरळ, पाल किंवा इतर कीटकांचा संपर्क होणार नाही याची दक्षता घ्यावी, धान्य व इतर खाद्यसाहित्य अन्नसुरक्षा मानकांनुसार साठवावे, तसेच शासनाने निश्चित केलेल्या मेनूनुसारच विद्यार्थ्यांना आहार द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

विद्यार्थ्यांना जेवण वाढण्यापूर्वी संबंधित शिक्षकांनी शिजविलेल्या अन्नाची चव घेऊन त्याची गुणवत्ता तपासावी आणि त्यानंतरच विद्यार्थ्यांना आहार द्यावा, असेही जिंतूरकर यांनी स्पष्ट केले.



**नांदेड** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून नांदेड दक्षिण मतदारसंघात बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर ओम गार्डन येथे घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन आ. हेमंत पाटील, आ. आनंद पाटील बोंढारकर यांच्या हस्ते दीपक प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड आदींची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. **(छाया – पुरुषोत्तम जोशी)**

## मटका अड्ड्यावरील धाडीत १.04 लाखाचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– अवैध धंद्यांविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने हबिबिया कॉलनी येथील कल्याण क्लोज नावाच्या मटका जुगार अड्ड्यावर धाड टाकली. या कारवाईत १ लाख ४ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुप्त माहितीच्या आधारे दि. २१ जुलै रोजी गोपनीय माहिती मिळाली की, मोहम्मद इम्रान मोहम्मद गौस यांच्या बंद घरात कल्याण क्लोज मटका जुगार सुरू आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सर्च वॉरंट घेऊन पंचांसमक्ष छापा टाकण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच काहीजण पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. त्यापैकी कुणाल नरेश भुरेवाल वय २१, रा. साईनगर, शक्तीनगर, नांदेड आणि शेख महेमूद शेख महेबूब वय ५७ वर्षे, रा. इक्बालनगर, नांदेड यांना अटक करण्यात आली आहे. तर आरोपी मोहम्मद इम्रान मोहम्मद गौस, मोहम्मद फैजान मोहम्मद गौस, नूर मोहम्मद मन्सूर मोहम्मद, हकीम, आलिम व मिनाज हे पोलीस दिसताच पसार झाले.

घटनास्थळावरून रोख रक्कम, मोबाईल फोन, लोखंडी कपाट, टेबल, फायबर खुर्च्या व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ४ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८९४/२०२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पो.उप.नि. व्यंकट कुसमे तसेच पोलीस अंमलदार शंकर माळगे, शिवानंद कानगुले, कांबळे, आसिफ शेख यांनी पार पाडली.

## जीवघेणा हल्ला करणाऱ्या एकास अटक; दोघे फरार

**नांदेड (प्रतिनिधी)**– जुन्या भांडणाच्या कारणावरून एका ३५ वर्षीय तरुणावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केल्याची घटना नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हडको परिसरातील राज मंडप डेकोरेशन येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून एका आरोपीला अटक केली आहे. तर अन्य दोघांचा शोध पोलीस घेत आहेत.

सोमवार, दि. २० जुलै रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास हडको येथील राज मंडप डेकोरेशन येथे गणेश भुजंग मोरे (वय २४, रा. वाघाळा, नांदेड) व त्याचे दोन अनोळखी साथीदार यांनी संगनमत करून फिर्यादीचा भाऊ राजेश कचरू घोरे याला जुन्या वादाच्या कारणावरून शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण करत धारदार खंजराने वार करून त्याला गंभीर जखमी केले. या हल्ल्यात आरोपींचा जीव घेण्याचा उद्देश असल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

याप्रकरणी अनिश कचरू घोरे (वय ३५, रा. वाघाळा, नांदेड) यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८९२/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र बंदला ठाकरे सेनेचा पाठिंबा

**नांदेड (प्रतिनिधी)**– वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवार, दि. २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंद पाळण्याचे आवाहन केले आहे.

दिल्ली येथे नीट परीक्षेतील कथित भ्रष्टाचार व पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरु असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ॲड. आंबेडकर यांनी हे आवाहन केले आहे.

या आंदोलनात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांनी सुमारे २५ दिवस आमरण उपोषण केले. मात्र, सरकारकडून समाधानकारक भूमिका जाहीर न झाल्याने दि. २० जुलै रोजी जंतर-मंतर ते संसद भवन असा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चादरम्यान आंदोलनकर्त्यांवर पोलिसांकडून लाठीमार झाल्याचा आरोप करण्यात आला असून, या घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे.

या महाराष्ट्र बंदला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नांदेड मुख्य महानगरप्रमुख प्रकाश मारावार यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यांनी नांदेड शहर व जिल्ह्यातील सर्व शिवसैनिक, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांना मोठ्या संख्येने बंद व निषेध रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः एमपीएससी, यूपीएससी, नीट, जेईई, वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या आंदोलनात सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठविण्याचे आवाहन केले आहे.

## वंचितच्या बंदला पीपल्स रिपब्लिकन पार्टीचा पाठिंबा

**नांदेड (प्रतिनिधी)**– देशभरातील नीट व इतर परीक्षा पेपरफुटी संदर्भात सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सोनम वांगचूक यांना आमरण उपोषण स्थळावरून दि. १८ जुलै रोजी हटविण्यात आले आहे.

नीट परीक्षा घोटाळ्याबाबत नवी दिल्ली येथे दि. २० जुलै रोजी आंदोलन करण्यात आले. तेव्हा दिल्ली पोलीस व साध्या वेशातील लोकांनी आंदोलकांवर हल्ला केला असा आरोप करीत या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी दि. २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. वंचित बहुजन आघाडीने घेतलेल्या निर्णयाला पीपल्स रिपब्लिकन पार्टी नांदेड जिल्ह्याच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत महानगरपालिकेतर्फे 'महिला आरोग्य तपासणी शिबीर' संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** – महानगर-पालिकेच्यावतीने आणि महापौरांच्या विशेष पुढाकारातून मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांतर्गत आयोजित करण्यात आलेले 'महिला आरोग्य तपासणी शिबीर' बुधवार, दि. २२ जुलै रोजी महापालिकेच्या शिवाजीनगर येथील मातृसेवा केंद्रात पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून शहरातील शेकडो गरजू, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सामान्य कुटुंबांतील महिलांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार पुरविण्यात आले. महिलांचे आरोग्य हाच कुटुंबाचा मुख्य आधारस्तंभ आहे. या विचाराने महिलांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती करणे आणि त्यांना जागेवरच तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

महिलांच्या आरोग्य तक्रारींचे वेळेत निदान व्हावे यासाठी महापौर कविता मुळे यांनी पुढाकार घेऊन महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला या विशेष शिबिराच्या आयोजनाचे निर्देश दिले होते. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी महापौर कविता मुळे, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत, आ. अमर राजूरकर, माजी महापौर जयश्री पावडे, स्वीकृत सदस्य डॉ. अंकुश देवसरकर, विजय येवनकर, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.




हनुमंत रिठ्ठे आणि पालिकेतील इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या शिबिराचा शहरातील विविध प्रभागांतून आलेल्या माता-भगिनींनी आणि किशोरवयीन मुलींनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. या शिबिरात आलेल्या महिलांसाठी अत्यंत सुसज्ज अशा तपासणी कक्षांची व्यवस्था करण्यात आली होती. ज्यामध्ये संपूर्ण सेवा पूर्णपणे मोफत पुरविण्यासह स्त्रीरोग तज्ज्ञ, फिजीशियन व इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी महिलांची सखोल तपासणी केली. ज्यामध्ये रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन आणि इतर आवश्यक प्राथमिक चाचण्या मोफत करण्यात आल्या.

## नांदेड जिल्ह्यात स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाभर विविध कार्यालये, पक्ष तथा सामाजिक संघटनांच्यावतीने विविध उपक्रम राबवून अभिवादन करण्यात आले.



**मनपात स्व. अजितदादा पवार यांना अभिवादन**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री, विकासाभिमुख नेते स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त दि.२२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये त्यांच्या प्रतिमेस महापौर सौ. कविता मुळे आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

राज्य शासनाच्या अधिकृत परिपत्रकानुसार नांदेड महानगरपालिकेत हा अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि राज्याच्या विकासात स्व. अजितदादा पवार यांनी दिलेले योगदान व त्यांची प्रशासनावरील पकड अत्यंत मोलाची होती. अजित पवार हे त्यांच्या स्पष्टवक्ते आणि निर्णयक्षम कार्यशैलीसाठी ओळखले जात. वक्तशीर नेते म्हणून त्यांची महाराष्ट्रात वेगळी ओळख होती.

याप्रसंगी महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, गटनेता साबेर चाऊस, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, उपायुक्त गंगाधर ईरलोड, शहर अभियंता सुमंत पाटील, सहायक आयुक्त मनिषा नरसाळे यांच्यासह नगरसेवक, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



**जि.प.मध्ये अजित पवार यांना अभिवादन**

महाराष्ट्राचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित अनंतराव पवार यांची जयंती नांदेड जिल्हा परिषदेत साजरी करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या हस्ते स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक तथा सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, सहायक आयुक्त (पशुसंवर्धन) डॉ. प्रवीणकुमार घुले, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी तसेच जिल्हा परिषदेचे विविध विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**आ. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयात अजितदादा पवार यांना अभिवादन**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा कर्मवीर स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष, वसंतनगर येथील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिवादनसभा घेण्यात आली.

यावेळी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, सौ. प्रणिताताई देवरे-चिखलीकर, शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, कार्यालयीन सरचिटणीस श्रीधरराव नागापूरकर, युवक शहराध्यक्ष मोहसीन खान पठाण, मनपा गटनेते साबेर चाऊस, नगरसेवक हबीब बावजीर, युवक कार्याध्यक्ष माधव चिंचाळे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष जमीर पठाण, ॲड. नाज परवीन, बाळासाहेब सोनकांबळे, मौलाना, ममता सोनकांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**नायगाव येथे अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे दि. २२ ते २८ जुलै या कालावधीत आयोजित 'जनसेवा सप्ताह'अंतर्गत बुधवार, दि. २२ जुलै रोजी नायगाव येथे समाजोपयोगी उपक्रम पार पडले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांच्या पुढाकारातून वृक्षारोपण आणि गरजवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मिलेनियम पब्लिक अँड ज्युनिअर कॉलेज, नायगाव येथे स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com